www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

# दैनिक युवक आधार

तरुणांचा बुलंद आवाज
मराठी




मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 281 वा बुधवार दि. 25 जून २०२५ किंमत : 2 रु पृष्ठ : ४

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

**दहा महिन्याचा कालावधी संपून अजून पर्यंत आरो हा दुरुस्ती नाही केला .**



**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

राळेगाव तालुक्यातील वनोजा गावातील आरो फिटिंग ला जवळ-जवळ एक वर्ष पूर्ण झाले असून सुरवातीला एक ते दोन महिन्याच्या कालावधीत आरो हा चालू होता तरी आरो हा जवळपास दहा महिन्याचा कालावधी संपून अजून पर्यंत आरो हा दुरुस्ती नाही केला.

## शक्तिपीठ महामार्गाला मंजुरी, २० हजार कोटींची तरतूद; GSTत बदल होणार, मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय

राज्य मंत्रिमंडळाची एक महत्त्वाची बैठक मंत्रालयात झाली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठ मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. समृद्धी महामार्गानंतर आता शक्तिपीठ महामार्ग करण्यावर राज्य सरकारने भर दिला आहे. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर लगेचच देवेंद्र फडणवीस यांनी शक्तिपीठ महामार्गाबाबत स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली होती. परंतु, अनेक ठिकाणी शक्तिपीठ महामार्गाला विरोध होताना दिसत आहे. यातच शक्तिपीठ महामार्गाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. तसेच महाराष्ट्रातील वस्तु व सेवा कर यामध्ये काही बदल केले जाणार आहेत. राज्यातील १८ तीर्थक्षेत्रांना जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गास अनेक जिल्ह्यात शेतकऱ्यांचा विरोध असतानाही मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे आता ज्या भागातून या महामार्गाला विरोध करण्यात येत आहे, तेथील शेतकरी काय भूमिका घेतात, याकडे राज्याचे तसेच राजकीय वर्तुळाचे लक्ष लागलेले आहे. यातच महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा केली जाणार आहे. याबाबतही राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.

**राज्य मंत्रिमंडळ विभागाने घेतलेले ८ मोठे निर्णय**

- महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग - पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी (जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास मान्यता. राज्यातील साडेतीन शक्तिपीठ , दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर अंबेजोगाई सहित १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग. प्रकल्प महामंडळामार्फत राबवणार, प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता. (सार्वजनिक बांधकाम विभाग)



- आदिवासी शासकीय वसतीगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता व आहार भत्त्यामध्ये वाढ. दरमहा मिळणाऱ्या निर्वाह व आहार भत्त्यात दुपटीने वाढ, वार्षिक शैक्षणिक साहित्य खरेदी भत्त्यात भरीव वाढ. (आदिवासी विकास विभाग)
- कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग)
- महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करून, आगामी अधिवेशनात महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विधेयक आणणार. (वित्त विभाग)
- सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांसाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीतील तडजोडीसाठी सुधारणा विधेयक आणणार. (वित्त विभाग)
- वांद्रे पूर्व येथील उच्च न्यायालयासाठी आरक्षित भूखंडावरील विस्थापितांसाठी द्यावे लागणारे ३१ कोटी ७५ लाख रुपयांचे शुल्क माफ. या ठिकाणचे विस्थापितांचे अनिवासी व निवासी गाळे सार्वजनिक बांधकाम विभागास निशुल्क हस्तांतरीत होणार. (सार्वजनिक बांधकाम विभाग)
- पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मौ. चिखली येथील "दफनभूमी" च्या १ हेक्टर ७५ आर क्षेत्रापैकी ४०% क्षेत्र (७००० चौ.मी.) मैला शुध्दीकरण केंद्रासाठी (STP) वापरण्यास मंजुरी. (नगर विकास विभाग)
- महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हडको संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या २ हजार कोटींच्या कर्जास शासन हमी देण्याचा, त्यापोटीचे हमी शुल्क माफ करण्याचा निर्णय. यात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्य पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीचे ८२२ कोटी २२ लाख, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिःसारण प्रकल्पासाठी २६८ कोटी ८४ लाख रुपये व मिरा-भाईंदर महापालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीच्या ११६ कोटी २८ लाख रुपयांच्या मागणीचा समावेश.

## DSP न्यूज लाइव चॅनेलचे संपादक दत्तात्रय फाळके यांचा राष्ट्रीय समाज भूषण पुरस्काराने सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

महालक्ष्मी आधार फाउंडेशनच्या वतीने भारतीय संविधान जनजागृती अभियान अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रभर कौतुकास्पद कार्य करणाऱ्या कार्यवीरांचा राष्ट्रीय व राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात तडवळे तालुका खटाव गावचे सुपुत्र , डीएसपी न्यूज लाइव चॅनेलचे संपादक पत्रकार श्री.दत्तात्रय फाळके डीएसपी यांचा राष्ट्रीय समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यांनी केलेल्या सामाजिक , शैक्षणिक तसेच पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांना हा पुरस्कार

महालक्ष्मी आधार फाउंडेशनच्या संस्थापिका सौ.प्रतिभा शेलार , सातारा जिल्हा कारागृहाचे पोलीस अधिक्षक श्री.शमाकांत शेडगे साहेब , सातारा सत्र न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष अडव्होकेट सयाजीराव घाडगे साहेब , संयुक्त सचिव वंदना संकपाळ मॅडम यांच्याहस्ते पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. त्यांचा राष्ट्रीय समाज भूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आल्याने त्यांना विविध स्तरातून शुभेच्छा देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

हा पुरस्कार वितरण सोहळा सातारामधील राजवाडा येथील नगरवाचनालय पाठक हॉल याठिकाणी पार पाडला. या कार्यक्रमासाठी महालक्ष्मी आधार फाउंडेशनच्या संस्थापिका सौ.प्रतिभा शेलार , सातारा जिल्हा कारागृहाचे पोलीस अधिक्षक श्री.शमाकांत शेडगे साहेब , सातारा सत्र न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष अडव्होकेट सयाजीराव घाडगे साहेब , संयुक्त सचिव वंदना संकपाळ मॅडम इत्यादी मान्यवर उपस्थित होते.



## भडगाव शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी केला योग दिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**विभागीय प्रतिनिधी:**
**उमेश पाटील**

भडगाव: 21 जून 2025 रोजी श्री साई समर्थ मतिमंद मुलांची निवासी विद्यालय भडगाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिन दिव्यांग विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विशेष शिक्षक श्री उमेश जाधव सर यांनी सूत्रसंचालन करत कार्यक्रमाची सुरुवात केली. विद्यार्थ्यांना योगाबद्दल माहिती देत असताना आपल्या शरीराला योगा पासून होणारे फायदे मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या होणारे सकारात्मक बदल तसेच नियमित योगासने करावला हवे यासाठी देखील विद्यार्थ्यांना सुचित केले. कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील सर्व विशेष शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करत आंतरराष्ट्रीय योगा दिवस साजरा केला.



## प्रकल्पग्रस्तांचे नेते स्वर्गीय लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

प्रकल्पग्रस्तांचे नेते स्वर्गीय लोकनेते दि. बा. पाटील यांच्या १२ व्या स्मृतिदिनानिमित्त पनवेल येथील संग्राम निवासस्थानी त्यांना आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, कामगार नेते महेंद्र घरत, शिवसेनेचे उपनेते बबन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जयंत पगडे, माजी नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, विजय चिपळेकर, संतोष शेट्टी, प्रभाकर बहिरा, सुनील बहिरा यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्व. दि. बा. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करत त्यांच्या पवित्र स्मृतीस कृतज्ञतेने आदरांजली अर्पण केली. या वेळी सर्व उपस्थित मान्यवरांनी दि. बा. पाटील यांच्या कार्याचा गौरव करत त्यांचे स्मरण केले.

## सरकटे वझर ते वाटूर निकृष्ट दर्जाच्या कामाची वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्याकडून पाहणी

**दैनिक युवक आधार**
**.नामदेव मंडपे.**
**मंठा.जालना :**

तालुक्यातील सरकटे वझर ते वाटुर यादरम्यान बेलोरा येथे रस्त्याची अत्यंत निकृष्ट कामे चालू आहेत.या कामाची दिनांक २४ जुन २०२४ रोजी वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पाहाणी केली असता अत्यंत निकृष्ट दर्जा आढळून आला आहे .मंठा परतुर नेर सेवली मतदारसंघामधे असे अनेक कामे संबंधित कार्यकारी अभियंता व स्थानिक आमदार बबन लोनीकर यांच्या संगणमताने निकृष्ट व बोगस करण्यात आलेली असल्याने लवकरच यासंदर्भात जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेऊन संबंधित कामाचे अभियंता , कार्यकारी अभियंता ,गुत्तेदार व स्थानिक आमदार बबन लोनीकर यांची लेखी तक्रार करणार आहे असे वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष दिपक डोके यांनी यावेळी बोलतांना सांगितले आहे यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा



सचिव,गणेश खरात ,रंजीत चव्हाण सुरज गवळी प्रकाश खाडे दिलीप मगर शरद वाघमारे सचिन वाघमारे बंडूकोरडे विष्णू मुंडे नवनाथ मुंडे अनिल मुंडे सुनील गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आर्यारवी एंटरटेनमेंट आयोजित कलाकार बॉक्स क्रिकेट लीग – 2025 कलावंतांच्या जोशपूर्ण उत्साहात संपन्न..!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई :- (प्रमोद तरळ)**

्यारवी एंटरटेनमेंटच्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाच्या यशस्वी पर्वानंतर आर्यारवी एंटरटेनमेंटने प्रथमच कलाकार बॉक्स क्रिकेट लीगचे आयोजन केले होते. या बॉक्स लीगचे उदघाटन प्रसिद्ध समाजसेवक सन्माननीय डॉ. कौतिक दांडगे सर (संस्थापक, अध्यक्ष - महाराष्ट्र बाजार पेठ) यांच्या हस्ते नुकतेच परेल येथील टर्फ मैदानावर नारळ वाढवून करण्यात आले. याप्रसंगी आर्यारवी एंटरटेनमेंट प्रॉडक्शनचे सर्वेसर्वा श्री महेश्वर भिकाजी तेटांबे, प्रसिद्ध समाजसेवक सुशांत साळुंखे, आयोजक राजवीर जाधव, प्रबोधन शिरवाडकर, प्रणेश लोगडे, लक्ष्मी मनीष गुप्ता, अविनाश राऊत, संचित यादव, सागर डोके, संदीप भाकरे, अविनाश राऊत, समीर काळबे, सिने ग्राफिक डिझायनर मनीष व्हटकर, प्रसिद्ध लेखक दिग्दर्शक अनंत सुतार, रमेश यादव सर आदी मान्यवर उपस्थित होते. ही बॉक्स क्रिकेट लीग फक्त एकांकिका, नाटक, दूरदर्शन, मालिका आणि सिनेमा यातील कलावंतापुरता मर्यादित होती. या बॉक्स क्रिकेट लीगमध्ये एकूण आठ संघ सहभागी



झाले होते. त्यात प्रामुख्याने "साठेची कार्टी", "सिने डान्सर", "मोरया", "कर्टन कॉल", "ॐ साई प्रॉडक्शन", "भावकादेवी प्रॉडक्शन", "स्वामी समर्थ कलामंच" आणि "के स्टार". परेल वर्कशॉप जवळील मध्य रेल्वे मेकॅनिक्स इन्स्टिटयूट पोल मुंबई १२ क्रिकमेनिया ग्रीनलंड या टर्फ मैदानावर रंगलेल्या उत्साही वातावरणातील जोशपूर्ण अशा अटीतटीच्या आणि मनोरंजकपूर्ण सामन्यात मुंबईच्या "सिने डान्सर" संघाने बाजी मारून कलाकार बॉक्स क्रिकेट लीग - २०२५ चा कै.भिकाजी महादेव तेटांबे आणि कै.मनोरमा भिकाजी तेटांबे यांच्या स्मरणार्थ प्रथम विजेता चषक पटकावला तर "मोरया" संघाने कौतिक दांडगे यांच्या सौजन्य प्रित्यर्थ उपविजेता चषक पटकावला. त्याचप्रमाणे या बॉक्स क्रिकेट लीगमध्ये लोकनेते कै.विठ्ठलदादा खाडे आणि कै.सुनीताताई विठ्ठलराव खाडे यांच्या स्मरणार्थ 16 मॅन ऑफ द मॅच, कै.गीता आनंदा जाधव यांच्या समरणार्थ मॅन ऑफ द सिरीज, कै.शामराव नारायण व्हटकर आणि कै.हौसाबाई शामराव व्हटकर यांच्या स्मरणार्थ उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज आणि क्षेत्ररक्षक अशी विविध पारितोषिके प्रदान करण्यात आली. आर्यारवी एंटरटेनमेंटची ही प्रथमच कलाकार बॉक्स क्रिकेट लीग - २०२५ टूर्नामेंट यशस्वीरीत्या संपन्न करण्यासाठी सौ माधुरीओ मांजरेकर (म.उप.विभाग संघटक-वडाळा विधानसभा-उबाठा), डॉ. साजिदा अत्तर (प्रसिद्ध समाजसेविका), श्री.मनीष पाथरे (जिल्हा संपर्क अध्यक्ष द. रत्नागिरी - मनविसे), खलील शिरगांवकर (प्रसिद्ध समाजसेवक), दिलीप कराड, भूषण शिर्के (प्रसिद्ध समाजसेवक), शैलेश काळे (प्रसिद्ध समाजसेवक), श्रीं नितीन जाधव (प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक), श्री कुशल धुरी (उपाध्यक्ष - मनविसे), आणि सो लक्ष्मी मनीष गुप्ता (प्रसिद्ध समाजसेविका) यांनी विशेष मेहनत घेतली. अशा तऱ्हेने खेळीमेळीच्या आणि कलावंतांच्या जोशपूर्ण वातावरणामध्ये आर्यारवी एंटरटेनमेंटची ही पहिली कलाकार बॉक्स क्रिकेट लीग उत्साहात संपन्न झाली

## श्री शिवाजी विद्यालय रिसोड येथील मुलींना मोफत पासेस चे वितरण



**दैनिक युवक आधार**
***रिसोड:. प्रतिनिधी.**

**रणजीत ठाकूर** -स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ट महाविद्यालयात इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनींना रिसोड आगाराच्या माध्यमातून पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर मोफत एस टी पासेस चे वितरण करण्यात आले रिसोड एस टी आगाराचे आगार प्रमुख निलेश बोदडे वाहतूक नियंत्रक विजय वंजारी वरिष्ठ लिपिक उदयकुमार मोरे यांनी दिनांक 23 जून रोजी शाळेच्या नवीन सत्राच्या पहिल्याच दिवशी शाळेत येऊन मुलींना मोफत पासेसचे वितरण केले. 'एस टी पास थेट तुमच्या शाळेत' ही विशेष मोहीम एस टी महामंडळाकडून राबविली जात असून या अभिनव योजनेच्या माध्यमातून घरापासून शाळेपर्यंत ये-जा करणाऱ्या सर्व मुलींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. विद्यार्थीनींना पासेस काढण्यासाठी तासनतास रांगेत ताटकळत उभे राहावे लागत असे,त्यांना होणारा हा त्रास थांबवण्यासाठी एस टी महामंडळाकडून हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून त्यामुळे विद्यार्थिनींचा वेळ आणि त्रास वाचणार आहे. या अभिनव उपक्रमाच्या निमित्ताने शाळेत उपस्थित झालेले आगार व्यवस्थापक निलेश बोदडे वाहतूक नियंत्रक विजय वंजारी वरिष्ठ लिपिक उदयकुमार मोरे यांचा शाळेच्या वतीने प्राचार्य संजय देशमुख उपप्राचार्य संजय नरवाडे पर्यवेक्षक गजानन भिसडे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. व या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा .विजय देशमुख यांनी केले तर आभार डिगांबर पाचरणे मानले.*

## विंचूरला दुकानादाराचे दुकाना पुढे वस्तूचे अतिक्रमण; गुन्हा दाखल..

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर (नाशिक) :**
विंचूर येथील रहदारी असलेल्या रस्त्यावर होणाऱ्या अतिक्रमण बाबत वेळोवेळी लासलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने पथक काढून कडक सूचना देण्यात आल्या परंतु मारवाडी पेठ, तसेच बाजार गल्ली, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयालगत रोड, ग्रामपालिके जवळ व श्रीराम चौक या रस्त्यावरील मोटरसायकलचे व चारचाकी च्या अतिक्रमणात कायम वाढतच आहे. आज दि.२४ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास मारवाडी पेठ येथील भोलेहर जनरल स्टोअरचे दुकानासमोर, रस्त्यावर जनरल स्टोअरच्या दुकानाबाहेर रहदारीस अडथळा होईल अशा पद्धतीने अडकवलेल्या स्कूल बॅग व रस्त्यावर ठेवलेले दुकानातील विक्रीचे साहित्य लासलगाव पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी दुकानात घेण्यास सांगितले असता, आरोपी १) शंकरलाल मिस्त्रीलाल सोनी, २) दिलीप मिस्त्रीलाल सोनी, ३) भाग्येश दिलीप सोनी, ४) जयेश बाबुलाल सोनी यांनी संगणमत करून सार्वजनिक ठिकाणी मोठमोठ्याने आरडा ओरडा करून पोलीस पथकावर अवाश्च भाषेचा वापर करून लोकांची गर्दी जमवून दुकानाबाहेर रहदारीचा अडथळा होईल अशा पद्धतीने अडकवलेल्या स्कूल बॅगा काढून घेण्यास नकार देऊन, पोलिसांचे कायदेशीर आदेशाचे पालन करण्या स्पष्टपणे नकार देऊन अवज्ञा केली. म्हणून लासलगाव पोलीस ठाणे येथे गुरनं- १५७/२०२५ भा.न्या.सं. कलम २२१, २२३, २८५ सह मु. पो.का. कलम १०२, ११२, ११७ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार कांदळकर करीत आहे.

## नादस्फुर्ती ढोल ताशा पथक सामाजिक संस्थेतर्फे 'किल्ले रायगड स्वच्छता मोहीम"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :**
पनवेल येथील नादस्फुर्ती ढोल ताशा पथक सामाजिक संस्था हे केवळ सांस्कृतिक उत्सवांमध्ये सहभागी न होता, दरवर्षी सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रमही सातत्याने राबवत असते.



याच सामाजिक जाणिवेचा भाग म्हणून यावर्षी स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड येथे विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. पथकातील सदस्यांनी एकत्र येऊन गडावरील परिसरातील प्लस्टिक कचरा तसेच गडावर चढण्यासाठी/उतरण्यासाठी असणारी पायवाट तेथील तब्बल २५ बॅग्स कचरा उचलून खाली आणला.हा उपक्रम म्हणजे पर्यावरण रक्षण, ऐतिहासिक वारशाचे जतन आणि स्वराज्याप्रती असलेला आदर यांचं सुंदर उदाहरण ठरलं.इतिहास केवळ जतन करण्यासाठी नव्हे, तर त्याला स्वच्छ आणि सन्मानित ठेवण्यासाठीही आपली जबाबदारी आहे . या भावनेतून किल्ले रायगड स्वच्छता मोहीम राबवण्यात आली होती .




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक विभागाचे (अजित पवार गट) जिल्हाध्यक्ष तसेच आमचे मोठे बंधू श्री. असद भय्या पटेल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर!
**( दैनिक युवक आधार )**

# 'कॅंडेरे' चे पनवेल मध्ये नवीन शोरूम सुरू

## नवी मुंबईतील कॅंडेरे चे हे सातवे शोरूम

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई,वार्ताहर**
24 जून २०२५: आधुनिक फॅशन लक्षात घेऊन नव्या ट्रेंड्सनुसार दागिन्यांची रचना करणाऱ्या कल्याण ज्वेलर्सच्या कॅंडेरे या लाईफस्टाईल दागिन्यांच्या ब्रॅंडने पनवेल येथे आपले शोरूम सुरू केले आहे. या ब्रॅंडचे हे मुंबईतील सातवे शोरूम आहे. 'कॅंडेरे'ची आता देशभरात एकूण ७७ शोरूम्स झाली आहेत. आपल्या दागिन्यांच्या खास शैली अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचा कंपनीचा संकल्प यातून दिसून येतो. ब्रॅंड ॲम्बेसेडर म्हणून शाहरुख खानची निवड झाल्यानंतरच्या वाढीचा हा टप्पा फार सुखद आहे. विस्तार करण्याच्या धोरणातून 'कॅंडेरे' ने केवळ मुंबईतीलच नव्हे, तर देशभरातील रिटेल व्यवसायाच्या वाटचालीत हा एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन या दोन्ही चॅनेल्सचे एकत्रीकरण साधत, ग्राहकांना सुलभ आणि एकसंध खरेदीचा अनुभव देण्याच्या दीर्घकालीन धोरणावर या ब्रॅंडतर्फे भर देण्यात आला आहे. तरुण पिढीला, कार्यरत व्यावसायिकांना आणि फॅशनप्रेमी पुरुषांना उपयुक्त ठरतील असे हलके व सहज



वापरता येणारे दागिने हा 'कॅंडेरे' चा विशेष गुणधर्म आहे. १० हजार रुपयांपासून सुरू होणाऱ्या किमतीत आधुनिक व ट्रेंडनुसार डिझाईन केलेले हे दागिने ग्राहकांना त्यांच्या वैयक्तिक शैलीनुसार सहज परिधान करता येतील, अशी या दागिन्यांची रचना असते. विशेष प्रसंगी घालण्यासाठी, भेटवस्तू म्हणून देण्यासाठी आणि वैयक्तिक साजशृंगारासाठी हे दागिने अत्यंत उपयुक्त ठरतात. पनवेलमधील शोरूमच्या उद्घाटनानिमित्त 'कॅंडेरे' ने काही खास सवलती जाहीर केल्या आहेत. डायमंड व सॉलिटेअर स्टोन्सच्या किमतीवर सरसकट सूट देण्यात आली असून सोने व प्लॅटिनम यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर देखील सूट देण्यात आली आहे. सुरुवातीस डिजिटल पद्धतीला प्राधान्य देणाऱ्या या ब्रॅंडने आता 'ओम्नी-चॅनेल' ही पद्धत स्वीकारली आहे; म्हणजेच ऑनलाईन पद्धतीने आणि प्रत्यक्ष शोरूममध्ये जाऊनही ग्राहकांना आता हे दागिने सहजपणे खरेदी करता येतात. 'कल्याण ज्वेलर्स' च्या विश्वासार्हतेला साथ देत कॅंडेरे ब्रॅंड आपला विस्तार सातत्याने करीत आहे. केवळ शोभा वाढवण्यासाठीच नव्हे तर व्यक्तिमत्त्व खुलवणारे आणि शैली व्यक्त दागिने सादर करणे हा 'कॅंडेरे'चा उद्देश आहे. नवी मुंबईतील पनवेल येथील नवीन शोरूमच्या निमित्ताने 'कॅंडेरे'ने ग्राहकांच्या बदलत्या पसंतीनुसार दागिन्यांची रचना करण्याची आणि खास क्षण साजरे करण्याची आपली कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

# श्री पाणबुडी देवी कलामंच ( मुंबई ) तर्फे "कलगी-तुरा"कलेचं आयोजन

### समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा "समाजरत्न पुरस्कार - २०२५" देऊन होणार गौरव

**दैनिक युवक आधार**
**मुंबई - ( केतन भोज )**
कोकणातील पारंपरिक लोककला होळी आणि गणेशोत्सव हे कोकणातील खरे खुरे उत्सव. या दोन्ही उत्सवासाठी येथील शेतकरी मोकळा असतो.भाताची लावणी संपली की घरोघरी गणपती येतात आणि भाताची कापणी /मळणी संपताच शिमग्याचे म्हणजेच होळीचे वेध लागतात.कोकणातील या दोन्ही सणांशी येथील लोककला निगडीत आहेत.शक्ती-तुरा (जाखडी ) हा सामूहिक नृत्याचा प्रकार आहे.गणेशोत्सवात गावतल्या प्रत्येक वाडीत जाखडीचा संच असतो. आठ गडी फेर धरून वादकांच्या भोवती नाचतात. ढोलकी आणि घुंगरू ही पारंपरिक वाद्य आणि आधुनिक ढंगाची गाणी यांचा मेळ जाखडीत असतो.जाखडीत आता अनेक बदल झालेत. वेशभूषा,प्रकाश योजना,संगीत आणि वाद्यवृंद यांनी सध्याची जाखडी वेगवान आणि रंगीतसंगीत बनली आहे.आता जाखडीचा जंगी सामना जणू प्रेक्षकांसाठी पर्वणी असते.कोकणातील लोककला हीच जतन करण्यासाठी आणि रसिक मनोरंजनासाठी रायगड - रत्नागिरी असा दिग्गज शाहिरांचा जंगी मुकाबला होणार आहे.यामध्ये शक्तीवाले शाहीर प्रभाकर धोपट यांच्याविरुद्ध तुरेवाले शाहिर ज्ञानदीप भोईनकर शक्ती-तुरा रसिकांचे मनोरंजन करणार आहेत.रसिक हो आपली उपस्थिती अनमोल असून हा सामना मंगळवार दि.१५ जुलै २०२५,रोजी रात्रौ ८.३० वा.मा.दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह,विले पार्ले,पूर्व ( मुंबई ) येथे होणार आहे.या सामन्याचे आयोजन श्री पाणबुडी देवी कलामंच ( मुंबई ) यांनी केले असून अधिक माहितीसाठी किंवा तिकीटसाठी ९९३०५८५१५३ /९८३३६८९६४२ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचे आवाहन




आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.
तसेच या कार्यक्रमानिमित्त सामाजिक पटलावर अधोरेखित व्हावा असा स्तुत्य उपक्रम समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा श्री पाणबुडी देवी कलमंच,मुंबई यांच्यावतीने गौरव होणार असून त्यांना "समाजरत्न पुरस्कार - २०२५" देऊन त्यांच्या कार्याचा गौरव होणार आहे.यामध्ये प्रमोदजी गांधी -( उद्योजक/संपर्क अध्यक्ष - मनसे ता. गुहागर ),रविंद्रजी मटकर -( अध्यक्ष - नमन लोककला संस्था ( रजि.),रंगनाथ गंगाराम गोरीवले - ( चिकन्या भाई )अध्यक्ष - भैरी भवानी देवस्थान कमिटी,धोंडिबा दळवी -(संचालक-श्री गुळंबाई देवी विकास सेवा सोसायटी,कळसगादे),दिनेशजी कुरतडकर-(संस्थापक - कोकण कलामंच,मुंबई,),अरविंद मोरे "माऊली"-( अध्यक्ष - श्री समर्थ कृपा भजन मंडळ (नालासोपारा -विरार ) या सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्तींचा समाजरत्न पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात येणार आहे.सदर कार्यक्रमाचे निवेदन शाहीर शाहीद खेरटकर करणार आहेत

# शेतकऱ्यांचे तात्काळ विना शर्त पिक कर्ज मंजूर करा. (उबाठा) तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीः- नामदेव मंडपे मंठा**
ऊसध्याला शेतकऱ्याची अवस्था म्हणजे "आई खाऊ देना आणि बाप भीक मागू दे ना" या उक्प्रमाणे झाली आहे.शेतकऱ्याच्या कोणत्या शेतमालाला हमीभाव मिळ नाही.महिन्याच्या सुरुवातीस पाऊस पडल्याने बहुतांशी शेतकऱ्यांनी जवळील किडुक मिडुक खर्च करून पेरणी केली आहे.मात्र मागील जवळपास पंधरा दिवसापासून पावसाने उघडीत दिल्याने बळीराजा चिंता तूर आहे.त्या मुळे राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांना विना विलंब तात्काळ पीक कर्ज मंजूर करावे अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की,
मागील वर्षातील नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांची



अवस्था दयनीय झाली असून राज्य शासनाच्या वतीने पीक विम्याचे धरसोडीचे धोरण सुरू आहे. पिक कर्जासाठी शेतकऱ्यांचे अर्ज आल्यानंतर ही राज्य शासनाचे त्वरित कर मंजूर करण्याचे निर्देश असतानाही शेकडो अर्ज स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा मंठा हे प्रलंबित ठेवत असल्याने आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी वाढ होत आहे. त्या मुळे पीक कर्जा बाबत आलेले शेतकऱ्यांचे अर्ज तात्काळ निकाली काढावेत. तसेच वरिष्ठ शाखांकडे मंजुरी करिता फाईल पाठवावी लागते असे सबत देऊन टाळाटाळ केली जात आहे. तर काही ठिकाणी तांत्रिक बाबी दाखवून पीक कर्ज नाकारले जात आहे.
अशा परिस्थितीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बँकांना जाब विचारण्यासाठी बँकांची शाळा या आंदोलनात्मक कार्यक्रम राबविला जात असून शेतकऱ्यांचे पिक कर्ज त्वरीत मंजुर करावे, कोणतेही तांत्रिक कारण दाखवून पिक कर नाकारु नये, अशी मागणी करत तालुकाप्रमुख प्रदीप बोराडे यांचे नेतृत्वात मंठा शहरातील बँकांना करण्यात आली असून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला तर उबाठा पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात शेवटी दिला आहे. या निवेदनावर आसाराम बोराडे, देविदास खरात, प्रल्हाद कदम, संजय बोराडे राहुल बोराडे सचिन चव्हाळ गणेशराव खराबे, रवी काळे, विलास खराबे, अमोल खराबे, प्रसाद सिंह सखाराम बोराडे ,जुनेद पठाण ,ठाकुर, रितिक जाधव, गजानन झोल, ऋषिकेश वाघ, दत्ता गोरे, सचिन घेणे,इलियास शेख, तानाजी मोरे, तन्वीर शेख, विष्णुपंत वरकड, शेख ऐसान,शंकर कचरे, गणेश घोडके, प्रदीप घोडके, भागवत खराबे, विकास खराबे, सोफियान पठाण, यांनी सह्या केलेले आहेत.

# पनवेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन सप्टेंबरपासून उड्डाण एक टर्मिनल सुरु होणार

## खासदार श्रीरंग बारणे यांनी घेतला आढावा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**
मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल येथील लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला वेग आला आहे. इंटर टर्मिनल कनेक्टिव्हिटी असणारा भारतातील हे पहिलेच विमानतळ असणार आहे. वार्षिक दोन कोटी प्रवासी क्षमता असलेले टर्मिनल एक सप्टेंबर 2025 पासून सुरु होईल. येथून आंतरराज्यीय विमानसेवा प्राथमिक स्थरावर सुरु होणार असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली. मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी मंगळवारी प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भेट दिली. कामाचा संपूर्ण आढावा घेतला. अधिकाऱ्यांना कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या. अदानी एरपोर्ट विभागाच्या सीईओ मिनल नाईक, सिडको प्रोजक्ट मॅनेजर गीता पिल्ले यांनी विमानतळाच्या कामाचे



सादरीकरण दिले. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, जिल्हा प्रमुख अतुल भगत, शिवसेना उपजिल्हा प्रमुख विनोद साबळे, शिवसेना पनवेल महानगर प्रमुख प्रथमेश सोमण, पनवेल शिवसेना तालुका प्रमुख रघुनाथ पाटील, उरण तालुका प्रमुख दिपक ठाकूर, शिवसेना शहर प्रमुख प्रसाद परब, तुकाराम सरख, सुनिल गोवारी, प्रसाद सोनवणे, शिवसेना उपमहानगर प्रमुख महेश सावंत, शिवसेना संपर्क प्रमुख मंगेश राणवडे, शिवसेना महिला उरण विधानसभा जिल्हा संघटिका मेधाताई दमडे व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, पुणे आणि मुंबईला जोडणाऱ्या पनवेलमध्ये हे आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. मेट्रो 1, मेट्रो 2, मेट्रो 3 यासह वॉटर टॅक्सी, स्थानिक लोकल ट्रेन सेवा आणि भविष्यातील मुंबई हैदराबाद बुलेट ट्रेन यांची थेट कनेक्टिव्हिटी आणि मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापासून नवी मुंबई विमानतळापर्यंत देखील थेट कनेक्टिव्हिटी असणार आहे. प्रदूषण रहित 'ग्रीन एअरपोर्ट' कन्सेप्ट राबविली जाणार आहे.1150 हेक्टर इतक्या मोठ्या परिसरात एअरपोर्टचा विस्तार होत आहे. विमानात इंधन भरण्याची अंडरग्राउंड पाईपलाईन तर्फे (ASF) प्रणाली कार्यन्वित केली जाणार आहे. सप्टेंबर 2025 पासून टर्मिनल वन सुरू होणार आहे. त्याची वार्षिक दोन कोटी प्रवासी क्षमता असणार आहे. 2029 पर्यंत टर्मिनल टू सह जवळजवळ 80 टक्के कामकाज पूर्ण होईल असे अपेक्षित आहे. सन 2036 पर्यंत चार टर्मिनल्स, एक व्हीआयपी टर्मिनल, जनरल एव्हिएशन (खाजगी विमाने) देशातील सर्वात मोठे कार्गो डेपो असे संपूर्ण विमानतळ शंभर टक्के विकसित होणार आहे. 3.7 किलोमीटरचा सर्वाधिक लांबीचा रनवे असणार आहे. त्यावर मोठी कार्गो विमाने व एअरबस ए 380 सारख्या विमानांचे लॅंडिंग आणि उड्डाण शक्य होणार आहे. मुंबईच्या सध्याच्या आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जवळ जवळ दुप्पट प्रवासी व विमानांच्या दळणवळणाची क्षमता आहे.

> विमानतळाच्या कामाने गती घेतली आहे. सप्टेंबर 2025 रोजी आंतरराज्यीय विमानसेवा प्राथमिक स्थरावर चालू होईल. सर्व वाहतूक व्यवस्थेला विमानसेवा जोडल्या जाणार आहेत. यामध्ये मेट्रो,भूमिगत रेल्वे,बुलेट ट्रेन या सेवेचा समावेश आहे. 2029 पर्यंत आंतरराष्ट्रीय विमाने पूर्णपणे उड्डाणे घेतील. देशातील महत्वाचे व मोठे विमानतळ म्हणून याकडे पाहिले जाते. विमानतळासाठी केंद्र सरकार, सिडको यांच्या माध्यमातून लागणारे सर्वतोपरी सहकार्य केले जाईल.
>
> श्रीरंग बारणे
> खासदार,
> मावळ

## फॉरेक्स ट्रेंडिंगच्या नावावर चाळीस लाखांची फसवणूक, चौघांवर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर** : फॉरेक्स ट्रेडिंग मध्ये गुंतवणूक करतो असे आश्वासन देऊन 40 लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी जाई मनोहर कदम , सुरज कदम ( दोघे कोरेगाव सातारा), सचिन डोंगरे (बोनकोडे), विकास निकम (कोपरखैरणे)च्या विरोधात तुर्भे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मनीषा किर्वे ह्या घणसोली येथे राहत असून त्यांच्या पतीची ओळख कोळखे, फलटण येथील सचिन डोंगरे यांच्याशी झाली. त्यावेळी विकास निकम व सचिन यांनी फॉरेक्स ट्रेडिंगची त्यांना माहिती दिली. जे के व्ही ग्लोबल या कंपनीच्या द्वारे फॉरेक्स ट्रेंडिंग मध्ये पैसे गुंतवतात आणि गुंतवणुकीवर झालेल्या नफ्याचे 30% कमिशन घेऊन उर्वरित 70 टक्के नफा गुंतवणूकदारांना देत असतात असे सांगितले. तोटा झाला तर सदर कंपन्या स्वतः गुंतवणूकदारांचे पैसे परत करत असतात. यावेळी जे के वी ग्लोबलचे मालक जाई मनोहर कदम व सुरज कदम यांच्या माध्यमातून फॉरेक्स ट्रेडिंग करतात असे सांगून त्यांच्यावर फोनवरून बोलणे करून दिले. त्यावेळी त्यांनी वीस लाख रुपये गुंतवले. त्यानंतर पुन्हा वीस लाख रुपये गुंतवले. यावेळी ट्रेंडिंग खात्यामध्ये चांगली ग्रोथ चालू असल्याचे विकास निकम याने सांगितले. खात्याचा तपशील मागितला असता खात्याबद्दल माहिती दिली नाही. त्यामुळे त्यांच्यावर संशय येऊ लागला. त्यानंतर कंपनीच्या मेल आयडीवर गुंतवणूक केलेले चाळीस लाख रुपये परत मिळणेविषयी मेल केला. यावेळी तुमचा व्यवहार पूर्ण झाला असून लवकरच निर्णय घेऊन तुम्हाला कळवू असा रिप्लाय आला. तसेच सचिन डोंगरे व विकास निकम यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली आणि जाई कदम व सुरेश कदम यांनी फोन घेणे बंद केले. फसवणूक झाल्याचे लक्षात येतात चौघांविरोधात गुन्हा दाखल केला.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## स्वर्गीय लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त आरोग्य शिबीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

प्रकल्पग्रस्तांचे नेते स्वर्गीय लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त लायन ग्रुप महाराष्ट्र राज्य व पनवेल उरण आगरी समाज मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल शहरातील ज्योतिबा महात्मा फुले सभागृहात (आगरी समाज हॉल) मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप, दंत चिकित्सा, ईसीजी, मधुमेह, रक्तदाब तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत या शिबिराचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, संघर्ष समितीचे खजिनदार जे. डी.तांडेल, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, हेमलता म्हात्रे, सारिका भगत, भाजपचे पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, लायन ग्रुपचे अध्यक्ष बाळू फडके, उपाध्यक्ष रवींद्र शेळके महिला अध्यक्ष माजी नगरसेविका नीता माळी, विजय गायकर, यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी दिबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



## शेतीच्या वादातून वृद्धावर हल्ला.! सात आरोपींवर मालेगाव पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम.**
**गजानन पवार पाटील.**

**मालेगाव :-** तालुक्यातील चिवरा गावात शेतीच्या जुन्या वादातून झालेल्या भांडणात एका ६० वर्षीय शेतकऱ्याला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. या घटनेप्रकरणी मालेगाव पोलिस ठाण्यात गंभीर कलमांखाली सात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चिवरा येथील रहिवासी महादेव हरी मुठाळ (६०) यांनी तक्रार दाखल केली आहे की, दि. २१ जून रोजी रात्री ८ ते ८:३० च्या दरम्यान त्याच गावातील नारायण हरी मुठाळ आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी हातात काठ्या आणि रॉडने त्यांच्यावर हल्ला केला. जमिनीच्या वादातून त्यांनी त्याला आणि त्याच्या कुटुंबाला शिवीगाळ केली आणि त्याच्या मुलावर आणि पत्नीवर हल्ला केला. तसेच त्याला जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी नारायण हरी मुठाळ, किशन नारायण मुठाळ, आशा नारायण मुठाळ, मोतीराम हरिभाऊ मुठाळ, गोलू मोतीराम मुठाळ, विकास मोतीराम मुठाळ आणि नंदा शंकर मुठाळ, हे सर्व रहिवासी चिवरा, तहसील मालेगाव यांनी यांच्याविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल प्रशांत वानखेडे करत आहेत.

## अवैध दारू बंद करण्यासाठी वडगाव पोलिस स्टेशन ला निवेदन

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

**मेटीखेडा :-** कळंब तालुका अंतर्गत येत असलेल्या गट ग्रामपंचायत कोळेझरी, पंगडी येथील सरपंच्या अश्विनी दिलीप पवार व विष्णू आत्राम ग्रामपंचायत सदस्य व गावकरी पंगडी यांच्या कडून पंगडी गावातील दारू बंद करण्या साठी वडगाव पोलिस स्टेशन ला गावाकऱ्याच्या वतीने निवेदन देण्यात आले,कारण पंगडी गावामध्ये मोठ्या प्रमाणात अवैद्य दारू विक्री होत असल्यामुळे गावातील असंतोष वातावरण निर्माण होत आहे गावातील दारुड्या साठी सुशिक्षित नागरिक त्रासून गेलेले आहे त्यांच्या कुटुंबाला त्रास होत आहे नवयुवक वृद्धांना याचा त्रास सहन करावा लागत आहे म्हणून गावातील दारू लवकरात लवकर बंद करून द्यावी अशी गावातील नागरिका कडून आशा करत आहे या करिता पंगडी गावातील महिला व नागरिकाने वडगाव पोलिस स्टेशन गाठून पोलीस निरीक्षक बोखडे आणि ए.एस.आए.फुलके बिट जमादार पवन दोनाडकर हे उपस्थित होते यांना निवेदनाद्वारे देण्यात आले




# टॉवर लावलाय नावाला अन् रेंज नाही गावाला.. BSNL व JIO ज्या भोंगळ कारभाराने विरगाव नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** डिजिटल इंडियाचा नारा देत मोबाइल टॉवरच्या माध्यमातून इंटरनेट सेवा ग्रामीण भागात पोहचवली जात आहे, मात्र प्रत्यक्षात परिस्थिती पूर्णतः उलटी दिसून येते आहे. सिल्लोड तालुक्यातील विरगाव, म्हसोबानगर,हट्टी फाटा,भगवानवाडी परिसरात बीएसएनएल व जिओ मोबाईल टॉवरची रेंज केवळ महावितरणच्या विद्युतपुरवठ्यावर आधारीत आहे. गावातील विद्युतपुरवठा खंडीत झाल्यावर टॉवर बंद होऊन




आपोआप रेंज गायब होऊन जाते व सर्व ऑनलाईन सेवा ठप्प होतात. यामुळे विद्यार्थ्यांपासून ते वर्क फ्रॉम होम काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपर्यंत सगळ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. आता सर्व व्यवहार ऑनलाईन झाल्यामुळे अनेक ग्राहक हे दुकानदारांना युपीआयच्या माध्यमातून आर्थिक देवाणघेवाण करीत असतात. मात्र मोबाईल सेवा वारंवार खंडित होत असल्याने बीएसएनएल व जिओ सिम कार्डधारकांना अनेक वेळा मनस्ताप सहन करावा लागत आहे. बँकिंग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गर्दी राहत असल्याने भुसार मालाचे व्यापारी तसेच इतर व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात यूपीआयच्या माध्यमातून आर्थिक देवाणघेवाण करतात. परंतु मोबाईल टॉवर दुरावस्थेमुळे अनेकांचे ट्रांजेक्शन अडकत असल्याने फजिती होत आहे. यामुळे आर्थिक देवाण-घेवाणीची समस्या निर्माण झाली आहे. सुरुवातीला स्वस्तात रिचार्ज व विविध योजनेच्या माध्यमातून जिओने ग्राहकांचे लक्ष वेधून सिमकार्डधारकांची संख्या वाढवली. मात्र आताच्या स्थितीत रिचार्जमध्ये वाढ केली आहे.महागडे रिचार्ज खरेदी करुनही मोबाईलची इंटरनेट सेवा मात्र कासवाच्या गतीने मिळत आहे. त्यामुळे ग्राहकांच्या खिशाला झळ बसत आहे.अनेक ग्रामस्थांनी आता जिओ सिमकार्ड पोर्टेबल करून दुसऱ्या कंपनीच्या सिमला पसंती देत आहे. तर दुसरीकडे बीएसएनएलचा रिचार्ज स्वस्त करुन कंपनीने इतर कंपन्याना धक्का दिला खरा, मात्र यांचा गावात टॉवर असूनसुध्दा ग्रामस्थांना फायदा मिळत नसल्याने बीएसएनएल च्या सिमकार्ड धारक ग्राहकांमध्ये मोठी घट होत आहे. लवकरात लवकर बीएसएनएल व जिओ टॉवरची दुरुस्ती करुन मोबाईल कव्हरेज व इंटरनेटसेवा सुरळीत करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## निफाड येथे स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**उत्तर महाराष्ट्र विभागीय संपादक**
**विनोद गायकवाड**

निफाड मध्ये नवनिर्वाचित नाशिक ग्रामीण जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे यांचा भव्य सत्कार स्वारिपच्या निफाड तालुकाध्यक्ष पदी सुरेश खडताळे तर शहराध्यक्ष पदी दादाभाऊ काऊटकर यांची निवड

निफाड तालुक्यात आज दुपारी कॉंग्रेस भवन येथे स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे नवनिर्वाचित नाशिक ग्रामीण जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल भव्य सत्कार निफाड मधील स्वारीपच्या कार्यकर्तेनी केला या कार्यक्रमाचे अध्यक्ष नरहरी निर्भवणे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे भगवान गरूड (ना.जि.संपर्क प्रमुख)किशोर जाधव (उत्तर महा.अध्यक्ष)अनीता गडाधरा (महीला जिल्हाध्यक्ष)उपस्थित होते यावेळेस महेंद्र पगारे यांनी पक्षाचे ध्येय धोरण व जबाबदाऱ्या या संदर्भात मार्गदर्शन केले तसेच जुनी निफाड कार्यकारणी बरखास्त करून नवनिर्वाचित निफाड तालुकाध्यक्ष म्हणून मनोजभाई संसारे यांचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून औळखले जाणारे सुरेश भाई खडताळे तसेच आंबेडकरी




चळवळीतील अभ्यासु नेते म्हणून ओळखले जाणारे दादाभाऊ काऊटकर यांच्या निवडीची घोषणा जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे यांनी केली त्याचा शाल पुष्प गुच्छ देऊन सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे भगवान गरूड (ना.जि.संपर्क प्रमुख)किशोर जाधव (उत्तर महा. अध्यक्ष)अनिता गडाधरा(जिल्हाध्यक्ष महीला) मोहन जावळे (जेष्ठ नेते)शामभाऊ पगारे(जेष्ठ नेते)सुरेश खडताळे राहुल गांगुर्डे प्रविण गायकवाड प्रकाश गायकवाड अमोल बोठारे आकाश गायकवाड प्रतीक पगारे सुजीत भालेराव नवनाथ पगारे किरण मोरे अरूण सोनवणे रोहन रणधीर आकाश गोतीश याच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते

## एकाच रॉयल्टीवर दिवसभर होणारी रेती वाहतुक थांबवा, मनसेची मागणी

### चंद्रपूर जिल्ह्यातील रेती तस्करांसाठी राळेगाव तालुका ठरतोय हॉटस्पॉट

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:**
**जितेंद्र खोडे**



राळेगावः-एकच रॉयल्टी काढून दिवसभर रेती तस्करी केल्या जात असल्याने यावर प्रतिबंध करण्याची मागणी मनसेच्या वतीने उपविभागीय अधिकारी राळेगाव यांच्याकडे करण्यात आली.राज्यात मोजकेच रेती घाट लिलाव झाले असुन याचाच फायदा रेती तस्कर चांगल्या प्रकारे करून घेतल्या जात असल्याचा प्रकार राळेगाव तालुक्यात सुरू आहे.लगतच्या चंद्रपूर जिल्ह्यातील सोईट व बार्मडा रेती घाट लिलाव झाला असुन या ठिकाणी मिळणाऱ्या अधिकृत रॉयल्टीच्या आधारे रेती विक्री करणे गरजेचे असताना मात्र रेती तस्करांनी शक्कल लढवून एकच रॉयल्टी काढून त्याद्वारे रेती घाटावरील इतर ठिकाणची रेती चोरून त्याची दिवसभर वाहतूक राळेगाव तालुक्यात खैरी,वडकी,राळेगांव मार्गे आणुन विकल्या जात आहे. या पास वर केवळ चार ब्रास रेती वाहतूक करण्याची परवानगी असताना मात्र सात ते आठ ब्रास रेती वाहतूक टिप्पर द्वारे केली जात आहे. या ओव्हर लोड वाहतुकीमुळे रस्त्याची तर वाट लागतच आहे,परंतु भरधाव धावणाऱ्या या टिप्परमुळे नागरिकांच्या जीवाला सुध्दा धोका निर्माण झाला आहे. एकाच पासच्या आधारावर दिवसभर रेती वाहतूक केल्या जात असल्याने शासनाचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे यावर कारवाईची गरज असल्याने त्याकरिता खैरी येथे महसूल विभागाच्या वतीने चौकी उभारण्यात यावी तसेच एकाच पास वर ज्यादा व ओव्हरलोड होणारी रेती वाहतूक थांबविण्यात यावी अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात येवुन यावर कारवाई न झाल्यास मनसे स्टाईल ने आंदोलन करण्याचा ईशारा मनसे जिल्हा उपाध्यक्ष शंकर वरघट यांनी उपविभागीय अधिकारी राळेगाव यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

यावेळी तालुकाध्यक्ष सुरज लेनगुरे, संदीप गुरनुले, उमेश पेंन्दोर, अमर आत्राम, अंकित चौधरी, कुणाल चिंचालकर, अनील वाढई, सह महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

# अपमानास्पद वागणुकी विरोधात महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाचा निषेध बांगडी मोर्चा.

**दैनक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

**वाशिम** जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना ऑनलाइन काम पूर्ण न झाल्यास प्रकल्प अधिकारी व मुख्य सेविका अपमानास्पद वागणूक देतात अपशब्द वापरतात या विरोधात व काही अंगणवाडी सेविकांचे मानधन थकले आहेत ते मिळण्यासाठी मोर्चाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम,जिल्हा वाशिम व मा. जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद वाशिम, जिल्हा वाशिम यांना निवेदन दिले. निवेदनातील मागण्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडून अंगणवाडी सेविकांवर होत असलेल्या



दडपशाहीच्या विरोधात दि. २३जुन २०२५ रोजी, जिल्हा परिषद कार्यालयावर बांगडया मोर्चा काढण्यात आला महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने आपणास खालील निवेदन करीत आहोत. दि. १२ नोव्हेंबर २०२४ च्या पत्रानुसार, गरोदर व स्तनदा माता तसेच ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना, टीएचआर वाटप करतेवेळी, पोषण ट्रॅकर ॲपच्या माध्यमातून आधार डेटा बेसद्वारे ई- केवायसी करून लाभार्थ्यांचे फोटो काढण्याची सूचना देण्यात आली आहे. फेस रेकॉगनेशन व केवायसी करताना अंगणवाडी सेविकांना अडचणी येत आहे. त्या अडचणी सोडविणे, शासन प्रशासनाचे कर्तव्य असून त्या कर्तव्याचे पुर्तता न करता, प्रकल्पा कार्यालयाच्या अधिकारी व मुख्यसेविका पर्यवेक्षिकांकडून अंगणवाडी सेविकांना मानसिक त्रास दिले जात आहे. त्यांना अपशब्द वापरणे, लाज-लज्जा काढणे, कामातून कमी करण्याची धमकी देणे, असे मानसिक त्रासअंगणवाडी सेविकाना दिले जात आहे. पोषण ट्रॅकर अपवर काम करण्याकरिता, अंगणवाडी सेविकांना एप्रिल २०२४ पासूनचे सिम रिचार्जची निधी व नेटवर्क असलेले रिचार्ज सिम विनाविलंब देण्यात यावे जिल्हा व प्रकल्प कार्यालयाकडून अंगणवाडी सेविकांवर होत असलेली बेकायदेशीर दडपशाहीच्या विरोधात दि. २३ जुन २०२५ रोजी, जिल्हयातील अंगणवाडी कर्मचारी जिल्हा परिषद कार्यालयावर बांगडया मोर्चा काढण्यात आला. कार्यक्रम अधिकारी संजय गणवीर यांनी निवेदन स्विकारले. राजसिंह भैया राज्य सचिव यांनी मोर्चाचे नेतृत्व केले नवनाथ देवताळे जिल्हा समन्वय मोर्चा कौशल्या बेलखेडे जिल्हाध्यक्ष, चंद्रकला तायडे उपाध्यक्ष, रंजना सुद्रिक, सुलभा पतकी तालुका अध्यक्षा, श्रुती कतले तालुकाध्यक्ष, आम्रपाली पठाडे तालुकाध्यक्ष शहरी रिसोड मोर्चात बहुसंख्येने अंगणवाडी सेविका सहभागी होत्या.

**या निवेदनाच्या प्रतिलिपि**

मा. सचिव, मवावि, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई मा. आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, राममह भवन, बेलापूर नवी मुंबई मा. उपायुक्त (से.प्र), एकात्मिक बालविकास सेवा योजन, रागा भवन, बेलापूर, स्वी मुंबई मा. बालविकास प्रकल्प अधिकारी, एबाविये योजना, मा. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, वाशिम पोलिस स्टेशन, वाशिम यांना देण्यात आल्या.

# रस्त्याच्या मागणीसाठी प्रहारचे जलसमाधी आंदोलन

## प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजू गायकवाड**

उमरखेड ते करोडी रस्त्याची अवस्था अतिशय दयनीय झाली असून सदर रस्त्यावर ये जा करणाऱ्या शेतकरी बांधवांना व तसेच नागरिकांना मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. सदर रस्त्याची तात्काळ आर.सी.सी बांधकाम करावे व रस्त्यावरील येणाऱ्या लेंडी,नाल्यावरील पुलांची उंची



**दिलेल्या वेळेत काम पूर्ण न झाल्यास कार्यालय ताब्यात घेऊ-मोहित वार**

उमरखेड करोडी रस्ता हा दिनांक एक जानेवारी 2026 पर्यंत पूर्ण करून नागरिकांना सेवा देण्याचे जे सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनीयर दुबे यांनी आम्हाला लेखी आश्वासन दिले आहे ते त्यांनी दिलेल्या वेळेत पूर्ण न केल्यास येणाऱ्या 26 जानेवारी रोजी बांधकाम विभागाचे पूर्ण कार्यालय ताब्यात घेऊ असा तीव्र इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे शहर प्रमुख राहुल मोहितवार यांनी दिला.


वाढवावी या मागणीला घेऊन प्रहार शहर प्रमुख उमरखेड राहुल मोहितवार यांच्या नेतृत्वात प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने पैनगंगा नदी पात्रात शेतकरी बांधवांसह जलसमाधी आंदोलन करण्यात आले. सदर रस्त्यावर वाहतुकी मोठ्या प्रमाणात असून करोडी,पेवा, येळम,काळेश्वर येथील नागरिकांना मुलांचे शिक्षणासाठी व दवाखान्यात उपचार घेण्याकरिता करोडी मार्गे उमरखेड करिता यावे लागते. परंतु रस्त्याची अवस्था अतिशय बिकट असल्याने रुग्णांना उपचार घेण्याआधीच कधीकधी जीव गमावातो महिलांची प्रस्तुती रस्त्यावरच वाहनामध्ये करावी लागते. असे भयानक चित्रसुद्धा या रोडच्या खराब अवस्थेमुळे बघायला मिळाले. पावसाळ्यातील चार महिने सदर रस्ता नागरिकांना नरक यातना जणू काय देत असल्याचे दिसून येते. सदर चार महिन्यात विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान सदर रोड मुळे होते. सदर रस्त्यावर मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधवांची शेती असून शेतीत लागवड करताना व शेतीत उत्पन्न झालेले हे आपल्या घरी किंवा बाजारपेठेत नेण्यासाठी त्यांना मोठी तारेवरची कसरत करावी लागते. सदर मार्गा शिवाय इतर कुठलाही पर्यायी रस्ता उपलब्ध नसल्याने त्यांना मोठ्या आर्थिक परिस्थितीचा सामना करावा लागतो. शेतकरी बांधवांना पहिलेच निसर्ग कोपतो तर प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या ही हलगर्जीपणामुळे त्यांना फटका बसतो.शेतकरी राजांनी न्याय मागायच्या तरी कुणाकडे असा प्रश्न शेतकऱ्यांमध्ये उद्‌भवत असल्याने प्रहार जनशक्ती पक्षाचे कार्यकर्त्यांनी आक्रमक होत सदर रस्ता तात्काळ आर.सी.सी बांधकाम करून सदर रस्त्यावरील येणाऱ्या नाल्या वरील पुलांची उंची वाढवावी या मागणीला घेऊन प्रहार कार्यकर्ते मराठवाडा विदर्भाच्या सीमेवर असणाऱ्या पैनगंगा नदी पात्रात पाण्यामध्ये जलसमाधी घेण्याच्या पवित्र घेतला असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी खडबडून जागे होत मध्यस्थी करत सदर काम तात्काळ सुरू केले व सदर काम एक जानेवारी 2026 पर्यंत पूर्ण करू असे लेखी असोसन उपविभागीय बांधकाम विभागाचे इंजिनीयर दुधे यांनी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले सदर आंदोलनात प्रहार जनशक्ती पक्षाचे उमरखेड शहर प्रमुख राहुल मोहितवार, तालुका उपप्रमुख गोपाल झाडे, शहर सचिव शाम चेके, उपजिल्हा युवा प्रमुख अभिजीत गंदेवार, प्रजेश खंदारे, रघुनाथ खंदारे, सिद्धार्थ मुनेश्वर, बालाजी मुडे,डिगांबर शिंदे,विनोद कवाने,संदिप आलट,सुनील देवसरकर, प्रवीण धरणे, दीपक जाधव,भगवानराव ,शंकरराव जाधव, सुरज जाधव ,करोडी, पेवा, येळम व काळेश्वर परिसरातील सरपंच, पोलीस पाटील, शेतकरी बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महिला व वृद्ध नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग-**

प्रहार जनशक्ती पक्षाने पुकारलेल्या जलसमाधी आंदोलनात परिसरातील मोठ्या संख्येने महिला तसेच वृद्ध नागरिकानी मोठ्या संख्येने सहभागी होत प्रशासना विरोधात रोष व्यक्त केला.

## उरणमधील द्रोणागिरी रेल्वे स्थानकावरील शेडचा पत्रा ठरणार प्रवाशांसाठी जीवघेणा.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**



पन्नास वर्षांच्या प्रतीक्षेनंतर उरण नेहरून बेलापूर लोकल सेवा १२ जानेवारी २०२४रोजी सुरू झाली परंतु ही सेवा अनेक समस्यांमध्ये अडकली आहे दिवसेंदिवस प्रवासी संख्येमध्ये वाढ मात्र लोकल फेऱ्या कमी तसेच सीएसटी लोकल उरण ठाणे लोकल ताबडतोब चालू करण्यात येण्यासाठी प्रवाशांची मागणी त्याचप्रमाणे रात्री उशिरापर्यंत लोकल सेवा असावी लोकल सेवा नादुरुस्त नसावी अशा अनेक मागण्यांच्या गर्दीत उरण लोकल रेल्वे लोकल सेवा अडकली आहे पावसाळ्यामध्ये तर उरण रेल्वे सेवेतील बऱ्याच स्थानकामध्ये सबवे मधून पावसाचे पाणी शिरत असते. परंतु उरणमधील द्रोणागिरी नोड या रेल्वे स्थानकावरील पत्र्याची शेड असलेला पत्राच सैल झाल्याने स्थानकात वारा घुसल्याने या शेड वरील पत्रा वाऱ्यासह तीव्र वेगाने हलत असल्याने तो अनावधानाने कधीही पडून प्रवाशांना जीवघेणा ठरणार आहे. रेल्वे प्रशासनाने या गोष्टी ची दखल घेऊन त्वरित या पत्र्याला खिळे मारून किंवा त्याची तात्काळ डागडुजी करावी अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

"द्रोणागिरी नोड रेल्वे स्थानकावरील शेडचा पत्रा वाऱ्यासह उडत असल्याने तो केव्हाही अनवधानाने प्रवाशांसाठी जीवघेणा ठरू शकतो त्यामुळे रेल्वे प्रशासनाने या गोष्टी ची दखल घ्यावी तसेच प्रवाशांनी सावधानता बाळगावी. "
**(स्वाती कामत द्रोणागिरी रहिवासी)**

## बोराळा धरणावरून रिसोड शहराला पाणीपुरवठ्यासाठी नवीन पाईपलाईन करण्यास शेतकऱ्यांचा विरोध, संघर्ष पेटणार.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

**वाशिम** : रिसोड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाकडून नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर झाली असून यासाठी अडोळ प्रकल्प बोराळा धरण ता. मालेगाव येथून पाणी उपसा केला जाणार आहे. मात्र या पाईपलाईनला शेतकऱ्यांचा विरोध असून पाईपलाईनचे काम सुरु झाल्यास संघर्ष पेटण्याची चिन्ह आहेत. या परिसरातील शेकडो शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष दामु अण्णा इंगोले यांच्या नेतृत्वात एकत्र येत शेकडो सह्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार आधीच या धरणारून मोठया प्रमाणात रिसोड शहराला पाणी पुरवठा केला जातो. तसेच या धरणावरून बोराळा,खडकी,शिरसाळा,सोमठाणा,दापुरी कालवे,ताकतोडा, शेलगाव इंगोले, शेलगाव बगाडे, वाघी, ढोरखेडा, खंडाळा या गावांना देखील पाणीपुरवठा केला जातो. याशिवाय या परिसरातील शेतीच्या सिंचणासाठी देखील याच धरणाच्या पाण्याचा उपयोग केला जातो. आता नव्याने रिसोड शहराला वाढीव पाणीपुरवढा याच धरणातून केल्यास त्याचा इतर गावांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो व शेतीच्या सिंचनासाठी पाणीच शिल्लक उरणार नाही. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी या प्रकल्पासाठी आपल्या जमिनी दिल्या त्यांच्यावर देखील मोठा अन्याय होणार आहे. म्हणून ही नवीन पाणीपुरवढा योजना बोराळा धरणावरून करण्यास या परिसरातील १५ गावांच्या गावकऱ्यांचा व शेतकऱ्यांचा विरोध आहे. या योजनेसाठी रिसोड शहराच्या जवळ उपलब्ध असलेल्या इतर धरणांचाही विचार केला जावा आणि बोराळा धरण येथून रिसोड शहरासाठी नवीन पाईपलाईन टाकण्यात येऊ नये अशी विनंती निवेदणाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात करण्यात आली आहे.

# जासई विद्यालयात दि.बा पाटील साहेबांना अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनियर कॉलेज दहागाव विभाग,जासई ता.उरण जि. रायगड या विद्यालयात, या विभागाचे भाग्यविधाते लोकनेते दि.बा. पाटील साहेब यांची १२ वी पुण्यतिथी भक्ती भावाने संपन्न झाली. सकाळी विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या दि. बा.पाटील साहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्यास शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष मा. सुरेश पाटील व कामगार नेते मा.भूषण पाटील यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पन करून विद्यालयाच्या प्राचार्या सौ. म्हात्रे के.जी.मॅडम व इतर सर्व मान्यवरांच्या हस्ते दि.बा. पाटील साहेबांच्या पालखीचे पूजन केले गेले.विद्यालयाच्या प्रांगणात विद्यालयातील विद्यार्थिनी सान्वी घरत हिने आपल्या धडाकेबाज शैलीत दि.बा. पाटील साहेबांचे जीवन चरित्र व त्यांचा लढा आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना ऐकविला. त्यानंतर फुलांनी सजविलेल्या पालखीत दि.बा.पाटील साहेबांची प्रतिमा ठेवून पालखी जासई विद्यालयातून संपूर्ण गावात फिरविण्यात आली. दि.बा.पाटील साहेबांच्या नावाचा विद्यार्थ्यांनी जयघोष केला. गावातील सुवासिनी,नागरिक, आबाळवृद्ध यांनी दि.बा. पाटील साहेबांचे आशीर्वाद घेतले. शेवटी पालखी संपूर्ण गावातून फिरून विद्यालयात परतली.या पालखी सोहळ्यासाठी जासई गावातील महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठान मार्फत सर्व विद्यार्थ्यांना व उपस्थित नागरिकांना नाश्त्याची व्यवस्था केली गेली होती. या भक्तिमय कार्यक्रमासाठी विद्यालयाचे व्हा.चेअरमन डी.आर.ठाकूर स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य नरेश घरत ,गणेश पाटील, मधुकर पाटील ,नुरा शेख,रघुनाथ ठाकूर,यशवंत घरत, सल्लागार समितीचे मान्यवर सदस्य ग्रामस्थ सर्व विद्यार्थी व सेवक उपस्थित होते . हा कार्यक्रम जासई हायस्कूल व महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाला.




## खारघर दारू बंदीचा विषय अधिवेशनात मार्गी लावा लिना गरड यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांना पत्र

**दैनिक युवक आधार**
**खांदा कॉलनी प्रतिनिधी**

गेली कित्येक वर्षे बाटली आडवी असलेल्या खारघर शहरात पनवेल महापालिका झाल्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागा कडून अचानक मोठ्या प्रमाणात दारूच्या दुकानाची लायसन्स मोठ्या प्रमाणात वाटली जात आहेत त्यामुळे पर्यावरण मुक्त या शहराची ओळख पुसली जाऊ लागली आहे पनवेल महापालिकेत दारू बंदीचा ठराव पास होऊन देखील तो प्रशासना कडून अंमलात आणला जात नाही त्यामुळे पनवेलचे लोकप्रतिनिधी म्हणून या गोष्टीची दखल घेऊन खारघर दारू बंदीचा विषय आपण येणाऱ्या अधिवेशनात माडांवाअसे पत्र कॉलनी फोरमच्या अध्यक्षा लिना गरड यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना दिले आहे गेली कित्येक वर्षे निसर्गरम्य खारघर शहरात दारू बंदी आहे परंतु पनवेल महापालिकेचे महसूल उत्पन्न वाढावे यासाठी हि दारू बंदी उठवली असावी असावी अशी शंका अनेकांना येते आहे त्यामुळे निसर्गरम्य खारघर शहराची ओळख पुसली आहे पनवेल महापालिकेत दारू बंदीचा ठराव पास होऊन देखील त्याची अंमलबजावणी होत नाही हे दुर्दैव आहे 75 टक्के महिलांनी ज्या ठिकाणी दारूला विरोध केला आहे तिथे दारूचे लायसन्स मिळणार नाही असा कायदा असताना त्यांची देखील अंमलबजावणी होत नाही हे दुर्दैव आहे अशी खंत व्यक्त करून दारू बंदीचा प्रश्न विधानसभेत उपस्थित करावा अशी मागणी लिना गरड यांनी पनवेलच्या लोकप्रतिनिधीन कडे केली आहे

## रोहीपेट येथे जुन्याच रस्त्यावर पुन्हा सीसी रोडचे काम

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष, जनतेत नाराजी**

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**



घाटंजी :तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या सायफळ ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या रोहीपेट येथील शंभर मीटर लांबीच्या रस्त्याचे सीसी रोडचे काम सध्या सुरू असून, या कामाचे दर्जा अत्यंत हलका असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, याठिकाणी पूर्वीच सीसी रोडचे काम झालेले असताना पुन्हा त्याच रस्त्यावर नव्याने काम सुरु करण्यात आले आहे. सदर रस्त्याचे काम सुरू होऊन काही दिवस झाले तरी या कामाची पाहणी करण्यासाठी संबंधित विभागाचा एकही अभियंता अद्याप आला नसल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. त्यामुळे हे काम ठेकेदाराच्या मनमानीनुसार व कसलीही देखरेख न करता सुरू आहे, अशी तक्रार नागरिक करत आहेत. याशिवाय, रस्त्याचे काम सुरु करताना माहिती फलक लावणे बंधनकारक असतानाही कोणतीही माहिती न देता काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे या कामासाठी कोणती योजना आहे, किती निधी मिळाला आहे, किती मीटरचे काम आहे याबाबत ग्रामस्थांमध्ये अंधार आहे. कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात येत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. सिमेंटऐवजी माती मिश्रीत रेतीचा वापर होत असून, खड्डे बुजवून त्यावर थेट काम सुरू केल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे या रस्त्याचे आयुष्य केवळ दोन महिने टिकेल का, असा प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे. ग्रामस्थांनी या कामाची सखोल चौकशी गुणनियंत्रक विभागामार्फत करून दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली आहे.

## नागाव-सहाण बायपासवरील पाल्हे पुलावर सुरू असलेल्या डागडुजीच्या कामाकडे पीडब्ल्यूडीचे दुर्लक्ष ? अवजड वाहतुकीने पुलाला हादरे... जबाबदार अधिकारी झोपेतच ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

नागाव–सहाण बायपासवरील पाल्हे पूल सध्या डागडुजीच्या अवस्थेत असूनसुद्धा, या मार्गावरून अवजड ट्रक, कंटेनर, डंपर यांची बिनधास्त वाहतूक सुरूच आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे गंभीर दुर्लक्ष आणि उदासीनता यामुळे या धोकादायक परिस्थितीकडे कोणीही गांभीर्याने पाहात नव्हते. 'सूचना फलक' लावणेही प्रशासनाच्या लक्षात आले नाही, ही बाब स्थानिकांच्या संतापाची आणि शासनाच्या हलगर्जीपणाची साक्ष देणारी ठरते. पुल डागडुजीच्या स्थितीत असताना "अवजड वाहनांना बंदी" हे स्पष्टपणे दर्शवणारे कोणतेही फलक न लावणे म्हणजे लोकांच्या सुरक्षेची सरळसरळ थट्टा आहे. स्थानिक नागरिकांनी हा प्रकार उघडकीस आणताच, सर्वांची झोप अचानक उडाली! आणि मग मध्यरात्री 'अवजड वाहनांसाठी पूल बंद' अशा आशयाचे बोर्ड लावले गेले. इतकी तातडी दाखवण्यापेक्षा आधी योग्य नियोजन का नव्हते, असा प्रश्न उपस्थित होतो. हा पूल म्हणजे अलिबाग, रेवदंडा, काशिद, मुरुड या भागांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा वाहतूक दुवा आहे. सुट्टीच्या दिवशी हजारो पर्यटक या मार्गावरून प्रवास करत असतात, शिवाय स्थानिक ग्रामस्थांसाठीही हा पूल जीवनवाहिनी आहे. असे असताना, JSW साळाव कंपनीचे अवजड ट्रक वारंवार या पुलावरून जातात, आणि त्या प्रत्येक ट्रकच्या प्रवासात पूल अक्षरशः हादरत आहे, धोका वाढत आहे !या गंभीर धोक्याकडे प्रशासनाने




वेळेत लक्ष दिले नसते, तर उद्याच पूल कोसळला असता तरी आश्चर्य वाटू नये !स्थानिक जनतेच्या पाठपुराव्यामुळे ही बाब अखेर कार्यकारी अभियंता मोनिका घायतडक यांच्या निदर्शनास आली आणि त्यांनी तातडीने आदेश देऊन सूचना फलक लावले. त्यांच्या कार्यतत्परतेचे निश्चितच कौतुक केले पाहिजे. पण यानंतरही प्रश्न कायम आहे फक्त फलक लावून जबाबदारी संपते का?हे फलक नावापुरते न राहता, अवजड वाहतुकीवर तत्काळ बंदी आणि नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा शासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग हे भविष्यातील संभाव्य दुर्घटनेचे थेट जबाबदार ठरतील.
हा पूल केवळ लोखंडाचा नव्हे, तर शेकडो जिवांचे जीवनसूत आहे त्यावर अशा प्रकारे खेळ मांडण्याची परवानगी शासनाला कोणी दिली?

## .. महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष यांच्यावतीने गुणवत्त विद्यार्थ्याचं गौरव सत्कार..

**दैनिक युवक आधार**
**संतोष पुदाले**
**तुळजापूर प्रतिनिधी**

नळदुर्ग येथील डॉक्टर आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल येथे दि.२२ जून रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे अधिकृत महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष सिद्धेश्वर विभुते सर यांच्या वतीने बारावी व दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्याचे व पालकांचे सत्कार ठेवण्यात आली होते या कार्यक्रमाची अध्यक्ष म्हणून अड श्री.अरविंद बेडगे या कार्यक्रमचे प्रमुख पाहुणे म्हणून नळदुर्ग पोलीस स्टेशनचे सहाय्यक उपनिरीक्षक श्री. आनंद कांगुणे साहेब धाराशिव जिल्ह्याचे उपजिल्हाप्रमुख श्री. जितेंद्र कानडे सर माजी तालुकाप्रमुख बाळकृष्ण घोडके कृष्णात मोरे नळदुर्ग शहर प्रमुख संतोष पुदाले माजी नगरसेवक विनायक अहंकारी सरदार सिंग ठाकूर राजेंद्र जाधव (मेजर) मनोज कस्तुरे या मान्यवराच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना हार शाल पुष्पगुच्छ व तसेच वृक्षाचे रोपटे देऊन सत्कार करण्यात आले यावेळी आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलाचे संचालक मारुती खारवे सर यांच्या वतीने आलेल्या सर्व मान्यवरांचे शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आले यावेळी विशेष सत्कार म्हणून जळकोट येथील पत्रकार मेघराज किलजे यांची कन्या एम.बी.एस.ला नंबर लागल्यामुळे डॉ जितेंद्र कानडे सर यांच्या वतीने सत्कार करण्यात आले यावेळी कार्यक्रमासाठी उपशहरप्रमुख सोमनाथ म्हेत्रे वैजनाथ पटणे सदन शेतकरी श्री भीमाशंकर पटणे पत्रकार दादा बनसोडे मेघराज किलजे अनिल कासार वाघमारे सर सुरज कांबळे औरादे सर प्रदीप भाऊ पुजारी सामाजिक समाजसेवक सिद्धू गोपने विजयकुमार पुजारी सुत्रावे मॅडम लाटे मॅडम पठाण मॅडम यांच्यासह पालक शेतकरी व्यापारी नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.दीपिका स्वामी मॅडम यांनी केले तर आभार सरदार सिंग ठाकूर पत्रकार मेघराज किलजे यांनी मानले हे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक यांनी केले




# वृक्षरोपण आणि संवर्धन चळवळीत सर्वांनी सहभाग नोंदवावा" मविप्र सभापती सभापती बाळासाहेब क्षीरसागर.

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

वृक्षवल्ली आम्हा सोयरी" हे गाणं तुम्ही ऐकल असेलच. ह्याचा अर्थ असा आहे की झाडे म्हणजेच वृक्ष हे आपले नातेवाईक आहेत, व त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे (जशी आपण आपल्या खऱ्या नातेवाईकांची घेतो)
झाडे आपल्या आयुष्यात खूप महत्त्वाचे असतात. पर्यावरण सुशोबित करणे ह्या व्यतिरिक्त देखील झाडे खूप काही करतात. आपल्या आजूबाजूचा कार्बन डायऑक्साइड सोशून, आपल्याला प्राणवायू देतात. झाडे आपले उनापासून सौरक्षण करतात. झाडे आपल्या मुलांच्या मदतीने, जमिनीला घट्ट धरून ठेवतात ज्याने करून माती पावसात वाहून जात नाही–मंग्ररूव झाडे त्सुनामी पासून आपले सौरक्षण करतात* *झाडे लावा झाडे जगवा ही म्हण तुम्ही ऐकली असेल, वरील सगळ्या गोष्टींमुळे वृक्षारोपणाचे महत्व तुम्हाला समजून येते. व आपण जास्तीत जास्त वृक्षारोपण असे कार्यक्रम हाती घेऊ अशी शपथ घेऊ* निफाड येथे २३ जून रोजी कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात रोपवाटिका उद्घाटन, वृक्ष रोप वितरण व वृक्षदींडी सोहळ्याचे आयोजन ‘‘ विकासाच्या विविध कारणामुळे वृक्षांची तोड मोठ्या प्रमाणात होत असून त्यातून मोठ्या प्रमाणात पर्यावरणीय प्रश्न तयार झालेले आहेत. जागतिक तापमानात मोठी वाढ होत आहे. वाढत्या तापमान वाढीमुळे मानवास वेगवेगळ्या नैसर्गिक आपत्तींना समोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत कर्मवीर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयाचे पर्यावरण संरक्षण चळवळ सक्षम करण्यासाठी व लोकजागृती करण्यासाठी निर्माण केलेली रोपवाटिका व वृक्षदिंडी सोहळा अतिशय उत्तम आणि समाजाला दिशा देणारा आहे. विद्यार्थ्यांनी यातून प्रेरणा घेऊन आपल्या शेतात, परिसरात रोपांची लागवड करून त्याचे संवर्धन करावे असे प्रतिपादन मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले. मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात आयोजित केलेल्या दहा हजार रोपांच्या रोपवाटीका उद्घाटन, वृक्षरोप वितरण व वृक्षदिंडी सोहळा कार्यक्रम प्रसंगी क्षीरसागर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रविण राऊत (वनपरिक्षेत्र अधिकारी निफाड) नवनाथ गांगोडे (वनपरिमंडळ अधिकारी निफाड) श्रीमती कल्पना पाईकराव (वनरक्षक अधिकारी निफाड) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रविण राऊत( वनपरिक्षेत्र अधिकारी निफाड ) म्हणाले की, पर्यावरण संवर्धन आणि रक्षण ही काळाची गरज आहे. आज मानावने पर्यावरणाचे रक्षण केले नाही तर पुढील काळात संपूर्ण जगाला मोठी किमंत मोजावी लागेल. शासकीय पातळीवर पर्यावरण संदर्भात विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. अशा उपक्रमांमध्ये महाविद्यालय, शाळा व समाजाने सहभाग घ्यावा. निफाड महाविद्यालयाचे पर्यावरण संवर्धनातील राबविलेले विविध उपक्रम हे कौतुकास्पद आणि सर्वांसाठी अनुकरणीय आहे.’’ असे गौरव उद्‌गार काढले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे म्हणाले, ‘‘ कर्मवीरांच्या विचारांचा वसा आणि वारसा जतन करीत महाविद्यालय दैनंदिन अध्यापनाबरोबर विविध उपक्रम राबवित असते. काळाची गरज ओळखून पर्यावरण संवर्धन करण्यासाठी वर्षभर वृक्षारोपन आणि संवर्धन उपक्रमाचे आयोजन करण्याचे निश्चित केले आहे. महाविद्यालय विकास समिती, शालेय समिती, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्या संयुक्तपणे रोपवाटिका निर्मिती तसेच प्रत्येकाने विठ्ठलाचे झाड, एक मूल तीस झाडे आणि माझा वाढदिवस माझे झाड ह्या उपक्रमांतर्गत रोपांची लागवड केली जाणार असल्याची माहिती दिली आणि यातून निश्चित पर्यावरण रक्षणाची जबाबदारी निफाड महाविद्यालय यशस्वीपणे पूर्ण करेल असा विश्वास या प्रसंगी त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी नवनाथ गांगोडे व श्रीमती कल्पना पाईकराव यांनी विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते 10,000 रोपवाटिकेचे उद्‌घाटन करून वृक्षदिंडी मिरवणूक, वृक्षपूजन व वृक्षारोपण करून करण्यात आले कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राष्ट्रीय छात्र सेना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन प्रा.डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार प्रा. ज्ञानेश्वर मोगल यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. प्रवीण ढेपले, प्रा. अभय वडघुले, डॉ. रोहिदास शिंदे, प्रा. भाऊसाहेब मुंतोडे, प्रा. शंकर गायकवाड, श्रीमती मनीषा कोटकर, पुनम ठाकरे, ऋचा जगताप, सविता कापसे, दीपिका जेऊघाले, पल्लवी खापरे, ऋतुजा आहेर, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर सेवक यांनी परिश्रम घेतले.




फोटो ओळ
१. निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात विकसित करण्यात आलेल्या रोपवाटीकेचे उद्‌घाटन करताना मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर प्रविण राऊत (वनपरिक्षेत्र अधिकारी निफाड) नवनाथ गांगोडे (वनपरिमंडळ अधिकारी निफाड) श्रीमती कल्पना पाईकराव (वनरक्षक अधिकारी निफाड) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे आदि २. निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयात विध्यार्थ्यांना वृक्ष रोपांचे वाटप करताना करताना मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर प्रविण राऊत (वनपरिक्षेत्र अधिकारी निफाड) नवनाथ गांगोडे (वनपरिमंडळ अधिकारी निफाड) श्रीमती कल्पना पाईकराव (वनरक्षक अधिकारी निफाड) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे

# शिवसेना चौलमध्ये बळकट शेणवईकर बंधूंवर विश्वास

### जनतेच्या सेवेसाठी नवी जबाबदारी

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**




मा. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने, शिवसेना नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार, तसेच आमदार मा. महेंद्रशेठ दळवी, श्री. राजाभाई केणी व श्री. अनंतजी गोंधळी यांच्या सूचनेनुसार श्री. सिद्धेश शेणवईकर यांची शिवसेना चौल शाखाप्रमुख पदी तर श्री. प्रशांत शेणवईकर यांची चौल पंचायत समिती गण चौल विभागप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.शेणवईकर बंधू गेल्या अनेक वर्षांपासून चौल परिसरात सामाजिक कामांमध्ये अग्रेसर असून, कोणताही गाजावाजा न करता लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी नेहमी पुढाकार घेत आले आहेत. अपघात, आजार, शासकीय योजनांमधून मदत, विद्यार्थी मार्गदर्शन, वयोवृद्धांना सहकार्य अशा विविध पातळ्यांवर त्यांनी सतत जनतेची साथ दिली आहे.
शिवसेनेच्या विचारांची निष्ठा ठेवत ते नेहमीच "पहिल्यांदा समाज, नंतर सत्ता" या तत्त्वावर काम करत आले आहेत. त्यांच्या या कार्यशैलीमुळे युवा वर्गासह विविध स्तरांतील नागरिक त्यांच्याशी जोडले गेले आहेत.या नवीन जबाबदाऱ्या त्यांच्या सामाजिक कार्याला अधिक बळ देतील व चौल परिसरात शिवसेना अधिक बळकट होईल, असा विश्वास स्थानिक शिवसैनिक व ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पी.एम श्री मुळेखंड शाळेमध्ये जागतिक योगा दिन साजरा.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधिं रणिता ठाकूर**
**उरण रायगड**

दिनांक २१ जून रोजी संपूर्ण जगात एकाच वेळी शासनाच्या नियमांना अनुसरून सकाळी साडेसहा ते पावणेआठ या वेळेत पी.एम.श्री शाळा मुळेखंड या शाळेत जागतिक योगा दिन साजरा करण्यात आला. उरण तालुक्यातील प्रसिद्ध योगाचार्य मुळेखंड गावचे सुपुत्र केशव म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना व शिक्षकांना विविध योगाचे मार्गदर्शन व कृती प्रात्यक्षिक करून घेण्यात आले. यामध्ये मुक्त हालचाली, वृक्षासन, ताडासन, वक्रासन, मकरासन, हलासन, मार्जेरी आसन, शवासन, कपाल भारती, अनुलोम विलोम, भ्रस्तिका, भ्रमरी व सूर्यनमस्कार इत्यादी आसनाचे प्रकार घेऊन विद्यार्थ्यांमध्ये योगाचे महत्त्व पटवून दिले. त्यांना शाळेचे उपक्रमशील शिक्षक संजय होळकर सर यांनी मोलाची साथ दिली. विद्यार्थ्यांना योगसाधना किती महत्त्वाची आहे याची अनुभूती म्हणून केशव म्हात्रे हे वयाचे 75 वर्षे असून सुद्धा अजूनही किती लवचिक व तंदुरुस्त आहेत याचे उदाहरण दिले. खेळाच्या, व्यायामाच्या व योग साधनेतून आपले शरीर रोगमुक्त व तंदुरुस्त करू शकतो याची माहिती दिली. तदनंतर 'एक पेड मा के नाम' हा उपक्रम वृक्षारोपण घेऊन विद्यार्थ्यांना आईच्या नावाने एक झाड दत्तक देण्यात आले. या उपक्रमांमध्ये शाळेचे मुख्याध्यापक अमृत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विद्या वाणी, दिशा तांडेल,अर्चना पाटील.मनीषा म्हात्रे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सरीता देवी शर्मा व अन्य माता पालक,विद्यार्थी अंगणवाडी ताई.वंदना पाटील, सविता पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# नैताळेत वैकुंठ रथाचे लोकार्पण

## ह.भ.प शिवानंदगिरी महाराज शास्त्री यांचे हस्ते भक्तिमय वातावरणात पार पडला सोहळा

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

"वैकुंठ रथ" हा शब्द दोन शब्दांनी मिळून बनला आहेः "वैकुंठ" आणि "रथ". "वैकुंठ" म्हणजे हिंदू धर्मात देवाचे निवासस्थान, विशेषतः भगवान विष्णूचे निवासस्थान. तर "रथ" म्हणजे एक वाहन. त्यामुळे, "वैकुंठ रथ" म्हणजे देवाच्या निवासस्थानाकडे (स्वर्गाकडे) घेऊन जाणारे वाहन, असा एक ढोबळ अर्थ होतो. नैताळे येथील स्वर्गीय विठ्ठल बोरगुडे एक सुसंस्कृत व्यक्तिमत्व होते भाऊंच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ एक अनोखा समाज उपयोगी उपक्रम राबवीला आहे नैताळे गावचा परीसर खूप विस्तारला आहे. लोकं शेतावर राहायला गेली आहे. परिसरात वस्त्या वाढल्या आहेत. नविन स्मशानभुमी गावापासुन दूर झाल्याने



अशा वेळी घर ते स्मशानभूमी अंतर खूप वाढलंय शिवाय गाव ते स्मशानभुमी हे अंतर वाढले आहे . काळाची गरज ओळखून बोरगुडे परीवाराने वैकुंठ रथ लोकांच्या सेवेसाठी अर्पण केला उपक्रम कौतुकास्पद असल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.वैकुठरथ लोकार्पन सोहळा स्वर्गीय भास्कर बोरगुडे व स्वर्गीय विठ्ठल बोरगुडे यांच्या पवित्र स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे वंशज

माझे आजोबा स्वर्गीय भास्कर बोरगुडे व वडील स्वर्गीय विठ्ठल बोरगुडे यांच्या पुण्यस्मरणार्थ दोन लाख रुपये खर्च करुन नैताळे गावासाठी वैकुंठरथ तयार केला आहे.आज त्याचा लोकार्पन सोहळा उत्सहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाला आज पासुन वैकुंठरथ नैताळे ग्रामपंचायतीच्या व्यावस्थापनाच्या ताब्यात देत असुन यापुढे त्यावर ग्रामपंचायतच नियंत्रण ठेवेल.

**शिवाजी बोरगुडे**
**नैताळे ता.निफाड**

शिवाजी बोरगुडे यांनी दोन लाख रुपये खर्च करुन साकारण्यात आलेल्या वैकुंठरथाचे लोकार्पन सोहळा मोठ्या श्रद्धा, भक्ती आणि उत्साहात ह.भ.प शिवानंदगिरी महाराज शास्त्री यांचे हस्ते पार पडला. हा सोहळा आज दुपारी नैताळे येथील राम आनंद लॉन्स येथे संपन्न झाला. ह.भ.प शिवानंदगिरी महाराज शास्त्री ,माजी सरपंच संजय बोरगुडे,शिवाजी बोरगुडे,जगन पाठक ,ग्रामविकास अधिकारी उज्वला भोईर,नवनाथ बोरगुडे,अरुण घायाळ यांच्या हस्ते पार पडला या प्रसंगी ज्ञानेश्वर घायाळ, रतन बोरगुडे ,भरत बोरगुडे ,लक्ष्मण बोरगुडे,रविंद्र बोरगुडे,महेश बोरगुडे ,बापूसाहेब बोरगुडे,किरण बोरगुडे,भिमराव बोरगुडे,नामदेव बोरगुडे,एकनाथ बोरगुडे, सुभाष बोरगुडे,सनी बोरगुडे,नितीन बोरगुडे,आनंदा डावखर ,तानाजी डावखर,योगेश बोरगुडे, सोमनाथ बोरगुडे,रामदास बोरगुडे यांच्यासह बोरगुडे परिवार व असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# महापुरुषाच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रयत्न, आरोपी ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**


: पनवेल शहरातील महापुरुषाच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. शैलू उर्फ गोलापंडित अशोक शुक्ला (वय 38 राहणार करंजाडे, मूळ उत्तर प्रदेश) असे आरोपीचे नाव आहे. 23 जून रोजी सकाळी दहाच्या सुमारास एक इसम पनवेल शहरातील महापुरुषाच्या पुतळ्याला धरून आरडाओरडा करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याला खाली उतरवले. त्याने त्याचे नाव शैलू उर्फ गोलापंडित अशोक शुक्ला असे सांगितले. त्याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात बीएनएस कलम 196, 298, 299 आणि अट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

# जोगेश्वरीची शान! सेजल बेलवलकरला राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत कांस्य पदक

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**
**दावणगेरे, कर्नाटका – जून २०२५:**

दावणगेरे (कर्नाटका) येथे नुकत्याच पार पडलेल्या सब-ज्युनियर नॅशनल इक्विप्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये सेजल बेलवलकर हिने दमदार कामगिरी करत एकूण कांस्य पदक (OVERALL BRONZE MEDAL) पटकावले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे जोगेश्वरीसह संपूर्ण मुंबईचं नाव देशभरात उजळलं आहे. TRUE POWER GYM, जोगेश्वरी (पूर्व) येथे प्रशिक्षण घेणारी सेजल ही केवळ १४ वर्षांची असून सब-ज्युनियर वयोगटात तिने अत्यंत कठोर मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवलं. स्पर्धेतील स्क्वॅट, बेंच प्रेस आणि डेडलिफ्ट या तिन्ही प्रकारांमध्ये एकूण वजन उचलत तिने राष्ट्रीय दर्जाच्या प्रतिस्पर्ध्यांमध्ये आपली छाप पाडली. सेजलच्या यशामागे तिच्या प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे पाठबळ आणि





तिच्या दैनंदिन कठोर सरावाची शिस्त आहे. दररोज सकाळ-संध्याकाळ मिळून ती २-३ तास प्रशिक्षण घेत होती. सोहम कारेकर आणि TRUE POWER GYM चे प्रशिक्षक संकेत चव्हाण म्हणाले, "सेजल ही आमच्या जिमची ताकद आहे. तिच्या जिद्दीला सलाम करावा लागेल." ही स्पर्धा देशातील अत्यंत महत्त्वाच्या स्पर्धांपैकी एक मानली जाते. विविध राज्यांतील टॉप पातळीवरील निवडक खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अशा स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचं पदक मिळवणं हे मोठं यश आहे. सेजलच्या या कामगिरीबद्दल स्थानिक मंडळे, क्रीडा संघटना आणि नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या आगामी आंतरराष्ट्रीय तयारीसाठीही जोरदार पाठिंबा मिळतो आहे. सेजलने सांगितलं, "माझं स्वप्न आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचं प्रतिनिधित्व करणं आहे. हे पदक म्हणजे फक्त सुरुवात आहे."

# निरा देवधर पाण्यासाठी शिंगोर्णी ते शिंगणापूर पाणी संघर्ष यात्रेला शिंगोर्णी येथील श्री. हनुमान मंदिरापासून सुरुवात ,ग्रामस्थांचा प्रचंड प्रतिसाद"

**दैनिक युवक आधार**
**शिंगोर्णी प्रतिनिधी**

**आकाश जाधव** -गेल्या अनेक वर्षापासून माळशिरस तालुक्यातील दक्षिण व पश्चिम भागातील शिंगोर्णी, बचेरी ,पिलीवचा काही भाग, सुळेवाडी, गारवाड, जळभावी, भाम अशा ठराविक गावाला अजूनही पाण्यापासून वंचित राहावे लागत असते ,याची तळमळ मनात ठेवून महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर यांनी 22 गावातील जनतेच्या पाण्याची तहान भागवण्यासाठी संघर्ष यात्रेला मौजे शिंगोर्णी येथील श्री हनुमान मंदिरा पासून असंख्य शेतकरी ग्रामस्थ तरुण वर्ग यांचे समवेत जोशपूर्ण वातावरणात सुरुवात केली . यावेळी आमदार उत्तमराव जानकर यांनी या माझ्या जनतेला पाणी मिळाल्याशिवाय संघर्ष थांबवणार नाही. यासाठी वाटेल तो अट्टाहास करण्याची माझी तयारी आहे. गेली अनेक वर्षापासून माझ्या या जनतेला पाण्यासाठी अशाप्रमाणे तडफडत राहावे लागले आहे ही वेळ बदलल्याशिवाय गप्प बसणार नाही या जनतेच्या पाठीमागे जनसेवक



म्हणून कायमस्वरूपी कोणत्याही वेळी मी खंबीरपणे उभा राहत आहे. अशाप्रकारे मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ नेते गणपत तात्या वाघमोडे युवा नेते पांडुरंग तात्या वाघमोडे, कण्हेरचे सरपंच बाजीराव माने, अरीपखान पठाण तालुक्यातील अनेक नेतेमंडळी पंचायत समिती माजी सदस्य शहाजी महाडिक, शिंगोर्णीचे सरपंच अक्षय धांडोरे उपसरपंच मनोज कदम, ग्रामपंचायत सदस्य अनिल जाधव , डॉक्टर कदम ,बचेरीचे सरपंच राणीताई विश्वजीत गोरड त्याचप्रमाणे आमदार पत्नी व त्यांचे समवेत अनेक महिला सुद्धा सामील झाल्या होत्या. त्याचबरोबर काळमवाडी. बचेरी पिलीव येथील ज्येष्ठ, तरुण मंडळी सहभागी झाले होते. शिंगोर्णीहून संघर्ष यात्रा बचेरीकडे रवाना झाली.

# पिंपळा येथे बाबारावजी जोगदंड कृषी महाविद्यालयातील शिक्षकासह विद्यार्थ्यांनी केले शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी**
**करण धोंगडे**

पिंपळा :- डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्नित,गीताई ह्युमनकाइंड बाबाराव जोगदंड कृषीडेव्हलपमेंट ट्रस्ट,पुणे संचालित कर्मयोगी बाबारावजी जोगदंड कृषि महाविद्यालय आमखेडा अंतर्गत कृषि कन्या कु.गायत्री भोयर,कु.मेघा पंधरे,कु. साक्षी भोयर,कु.पौर्णिमा इंगळे यांनी पिंपळा पो.आमखेडा ता. मालेगाव जि.वाशिम बीज प्रक्रियेबाबत प्रात्यक्षिक सादर करून बीज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले.शेतकऱ्यांना या प्रात्यक्षिकात त्यांनी बीज प्रक्रिया कशा पद्धतीने करावी याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कृषि विध्यार्थ्यांनी बीजप्रक्रिया केल्यावर त्यांपासून वाढीव दर्जेदार उत्पन्न मिळते हेही सांगितले.तसेच कीटकनाशक फवारणीच्या खर्चात बचत होते. योग्य प्रक्रिया केलेले बियाणे पेरल्याने कमी अथवा जास्त ओलाव्यातही पीक एकसारखे येते.



बीजप्रक्रिया केल्यामुळे पिकांची रोगप्रतिकार शक्ती वाढते,पीक जोरदार येते. जमिनीत नत्राचे स्थिरीकरण होते व जमिनीतील अपायकारक जीवाणूसून पिकाचे संरक्षण होते. असे अनेक प्रकारचं बीज प्रक्रियेचे फायदे शेतकऱ्यांना समोर विशद केले व बीज प्रक्रिया करता वेळेस घ्यावयाची काळजी या बाबत सुध्दा शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.या प्रात्यक्षिकावेळी तेथे शेतकरी व मा.सरपंच राधा ढंगारे आणि एकनाथ चौधरी,विठ्ठल चौधरी उपस्थित होते.या प्रात्यक्षिकासाठी कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम. क्षिरसागर आणि ए.डी. मानवतकर,कार्यक्रम अधिकारी प्रा.समाधान कव्हर व प्रा.एस. एम.गायकवाड कार्यक्रम समन्वयक,प्रा. पी.टी.निचळ,प्रा. एस.बी.वाकुडकर,वी. एच.बगाडे आणि इतर प्राध्यापक वर्गाचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

बिजप्रक्रियेचे फायदे :- जमिनीतून व बियाण्याद्वारे पसरणाऱ्या रोगांचा उदा.मररोग आणि मूळ कूज इ.प्रादुर्भाव टाळता येऊ शकतो.बियाण्याची उगवण क्षमता वाढते. बियाणे सडण्यापासून वाचवते.

# आमदार श्यामभाऊ खोडे यांनी केले अनसिंग येथील खरात कुटुंबाचे सांत्वन.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

**अनसिंगः-** वाशीम-मंगरूळपिर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय,कर्तव्यदक्ष आमदार श्यामभाऊ खोडे यांनी शनिवार २१ जून रोजी अनसिंग येथील खरात व लाटे कुटुंबाची भेट घेवून त्यांचे सांत्वन केले.तसेच तनुजा खरात यांचे पती अनिल खरात यांना आ.खोडे यांनी चार लाख रुपयाचा धनादेश देवून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अजून आर्थिक सहाय्य करण्यासाठी पुढाकार घेणार असल्याची ग्वाही दिली.तर गंभीर जखमी झालेल्या गंगाबाई लाटे यांना पुढील उपचारासाठी आर्थिक मदत देणार असल्याची माहिती यावेळी आ.खोडे यांनी दिली. १२. जून रोजी सायंकाळी ४.वाजताच्या सुमारास अनसिंग येथील तनुजा अनिल खरात (१९. वर्ष) आणि गंगाबाई लाटे (४०. वर्ष) या त्यांच्या घरापासून जवळच असलेल्या शेतामध्ये पिण्याचे पाणी आणण्यासाठी गेल्या होत्या.अचानक त्यावेळी विजांचा कडकडाट सुरू झाला. दोघीही पाणी घेवून घरी परत येतांना तनुजा खरात हिच्या अंगावर वीज पडून ती जागीच ठार झाली.तर सोबत असलेल्या गंगाबाई लाटे गंभीर जखमी झाल्यात. या नैसर्गिक आपत्तीमुळे खरात परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला.वाशीमचे आमदार श्यामभाऊ खोडे यांनी शनिवार २१ जून रोजी सकाळी अनसिंग येथे खरात व लाटे कुटुंबाची भेट घेवून दोन्ही कुटुंबाचे सांत्वन केले.यावेळी बाजार समितीचे संचालक नत्थुजी कापसे,भाजपचे माजी शहरअध्यक्ष राजकुमार मानधणे,माजी पंचायत समिती सदस्य बालु माल,सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल सातव,चंद्रकांत ठाकरे यांचेसह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.



अनसिंग येथील अनिल खरात यांना आ.खोडे यांनी दिला चार लाखाचा धनादेश. गंगाबाई लाटे यांनाही उपचारासाठी मदत करणार.

# आष्टी पंचायत समितीत शेळी पालन पत्र्याचे शेड, शेततलाव, विहीर प्रस्ताव मंजूरी देण्यासाठी,

### आझाद क्रांती सेनेच्या वतीने गटविकास अधिकारी व जिल्हा परिषद सिओ यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**

आष्टी पंचायत समितीमध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत शेळी पालन पत्र्याचे शेड, शेततलाव, विहीर, गायगोठा या प्रस्ताव प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी शेतकऱ्यांकडून मुख्य सुत्रधार कनिष्ठ लिपिकच सर्व प्रस्ताव करून स्वतः गटविकास अधिकारी आहे असा वागत मोठ्या प्रमाणात अर्थिक लुट करत असून अशा भ्रष्ट कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून बदली करावी अशी मागणी आझाद क्रांती सेनेचे तालुकाध्यक्ष संदीप वाल्हेकर यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. आष्टी पंचायत समिती कार्यालयात सध्या रोजगार हमी योजने अंतर्गत शेळी पालन पत्र्याचे शेड योजना, शेततलाव, विहीर, गायगोठा या प्रस्ताव प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी टी.एस. करण्यापासून ते प्रशासकीय मंजूरी पर्यंत संबंधित अधिकारी, कर्मचारी सर्वसामान्य, गोरगरीब शेतकरी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पंचायत समिती कार्यालयात येत असून त्यांची अर्थिक लुट कनिष्ठ सहाय्यक मोठ्या प्रमाणावर करत असून इतर संबंधित अधिकारी यात सहभागी असून अशा संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्याची तात्काळ चौकशी करून योग्य ती कारवाई करून



**शेतकऱ्यांची कनिष्ठ लिपिका कडून मोठ्या प्रमाणात आर्थिक लुट? संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी**

बदली करावी जेणेकरून गोरगरीब शेतकऱ्यांना न्याय मिळेल आणि त्यांचे प्रकरण मार्गी लागतील. जर कारवाई न केल्यास आपल्या पंचायत समिती कार्यालयासमोर आझाद क्रांती सेनेच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आझाद क्रांती सेनेचे तालुकाध्यक्ष संदीप वाल्हेकर यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.या निवेदनाच्या प्रति जिल्हाधिकारी बीड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांना दिल्या आहेत.

# लोकनेते दि. बा. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविकास आघाडीतर्फे वाहण्यात आली आदरांजली

दैनिक युवक आधार
पनवेल ( वार्ताहर )


: लोकनेते दि. बा. पाटील यांच्या पनवेल येथील संग्राम या निवासस्थानी जाऊन आज लोकनेते दि. बा. पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पगुच्छ वाहून महाविकास आघाडीतर्फे आदरांजली वाहण्यात आली . यावेळी शिवसेना उपनेते माजी आमदार सुरेंद्र (बाळ) माने , उपनेते बबनदादा पाटील , शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील , शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत , , काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत , जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, शिवसेना महानगर प्रमुख अवचित राऊत, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, कळंबोली शहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, शेकाप नेते काशिनाथ पाटील, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष सतीश पाटील, नारायण शेठ घरत , भास्कर पाटील ,विश्वास पेटकर, विलास फडके,राजेश केणी , मा. नगरसेवसक शंकर म्हात्रे , गोपाळ भगत , माधुरी गोसावी , उज्वला कुरघोडे आदी पदाधिकारी उपस्थित होते .




# विजपुरवठा सुरळीत करा,अन्यथा आंदोलन,मनसेचे प्रमोद कुलकर्णी यांचा महावितरणला इशारा

**दैनिक युवक आधार**
**संतोष पुदाले**
**तुळजापूर प्रतिनिधी**

नळदुर्ग-शहरातील महावितरण कार्यालयाच्या मनमानीपणामुळे शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत,वारंवार विज पुरवठा खंडीत होत असून याचा सर्वाधिक फटका सर्व सामान्य नागरिकांना नाहक सहन करावा लागत आहे,वारंवार विज पुरवठा खंडीत होऊन कमी अधिक दाबाने विज पुरवठा होत असल्याने घरातील विद्युत उपकरणाचे नुकसान होत आहे,विज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे शहरातील पाणी पुरवठ्यावर मोठा परिणाम होत आहे,शहरात पाणी दहा दिवसाआड येते पाणी सोडल्याच्या दिवशी विद्युत मोटारीने पाणी भरावे लागते,विज पुरवठा खंडीत झाल्यास त्यावेळी पाणी साठवून ठेवता येत नसल्याने नागरिक त्रस्त होत आहेत,विजे अभावी व्यवसायावरही परिणाम होत आहे,महावितरणने आठवड्यातील एखादा दिवस दुरुस्तीसाठी राखीव ठेवावा व तशी सूचना शहरवासियांना द्यावी,व त्याच बरोबर शहरातील अनेक ठिकाणच्या विजेच्या खांबावर विद्युत



तारा जुन्या असून जीर्ण झाल्या आहेत,अनेक ठिकाणी तुटल्या आहेत,तात्पुरती जोडणी केलेली आहे,त्यामुळे भविष्यात दुर्घटना घडण्याची शक्यता आहे,त्यामुळे अशा ठिकाणच्या विजेच्या तारा तात्काळ बदलून नव्या तारा टाकण्यात याव्यात व शहरातील विज पुरवठा नियमित व सुरळीत पणे सुरु ठेवावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी यांनी महावितरणच्या शाखा अभियंता यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.